नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २८६ * * अकोला * शनिवार, दिनांक १२ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त




## पाऊस आणि वीज कोसळल्याने ७३ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ११ :
देशात हवामानाचा दुहेरी फटका सुरूच आहे. एकीकडे तीव्र उष्णता आहे आणि दुसरीकडे वादळ आणि पावसाचा कहर आहे. उत्तर प्रदेश-बिहारमध्ये वादळामुळे ७३ जणांचा मृत्यू झाला. यापैकी ५९ जणांचा मृत्यू बिहारमध्ये आणि १४ जणांचा उत्तर प्रदेशात झाला.

हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, बिहार, झारखंड, ओडिशा, केरळ, तामिळनाडू, आसाम, मेघालय येथे ४०-५० किमी प्रतितास वेगाने वादळी वारे वाहू शकतात. वीज पडण्याची तसेच मुसळधार पावसाची शक्यता आहे. उत्तराखंडमधील चमोली येथे ढग फुटले. देशातही तीव्र उष्णता सुरूच आहे. बहुतेक राज्यांमध्ये तापमान ३५ अंश सेल्सिअस ओलांडले.

अग्राग्रलेख

### खरीखरी...

## ट्रम्पचा झाला जोकर

अमेरिकेचे दुसऱ्यांदा निवडून आलेले अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल जी घोषणा केली. त्यावरून त्यांचीच मस्ती उतरलेली दिसते. आपणच जणू काही जगाचे पालनकर्ते आहोत आणि जगातील सर्व देश आपला फायदा घेणार.? असे गृहीत धरून या माणसाने अमेरिकेतील आयात करावर मन मानेल तशी करवाढ केली. त्यातूनच जगातील सर्वात शक्तिशाली राष्ट्राचा अध्यक्ष कसा नसावा, याचे दर्शन ट्रम्प यांनी स्वतःच घडवले. या माणसाची लायकी भारतातील एखाद्या गावातला एखादा गावंढळ सरपंच होण्याइतकीही नाही. त्यांनीच मोठी शेखी मिरवत आणि दादागिरीचा बाणा दाखवत सर्व देशांवर जशास तसे शुल्क आकारले. अमेरिकेत उत्पादन सुरू करा, म्हणजे अमेरिकेतील तरुणांना काम मिळेल. हा त्या मागचा विचार होता. वस्तूस्थिती अशी आहे की, अमेरिकेतील बडे बडे उद्योग आता जवळपास बंद झालेले आहेत. त्यांना पुन्हा सुरू करणे. ही काही बटन दाबून विजेचा दिवा लावण्याइतकी सोपी गोष्ट नाही. मात्र या गोष्टीमुळे बढाईखोर ट्रम्पला अमेरिकेतच मोठी चपराक बसत आहे, असे परिपूर्णपणे आता दिसून आलेले आहे. जगातील अनेक देश माझे पाय चाटायला तयार आहेत. अशी मगरुर भाषा याच ट्रम्पाने केलेली होती. जगातील अनेक देशांनी त्याचा विरोध केला. खुद्द अमेरिकेत सुद्धा ज्या मोहम्मद तुघलकी निर्णयामुळे सर्वत्र ट्रम्प विरुद्ध निदर्शने होऊ लागली. त्यासोबतच जगातील अनेक शेअर बाजार धडाधड कोसळले. खुद्द अमेरिकेचा शेअर बाजारही पार रसातळाला गेला. अमेरिकेत महागाई वाढू लागली. इकडे, तिकडे चोहीकडे ट्रम्प आणि मस्क या कुतू की मुतू करणाऱ्या बिनडोकांना चांगलाच प्रसाद मिळू लागला. त्यामुळे आता यांची अक्कल ठिकाणावर आलेली दिसते. तरीही आता चीनसाठी अमेरिकेच्या आयातीवर जबरदस्त शुल्काची घोषणा यांनी केलेली आहे. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोणतीही कृती करताना, देशाच्या नेत्यांनी देशातील बुद्धिवंतांना आणि विचारवंतांना विश्वासात घेऊन धोरण ठरवायचे असते. पण आपली अक्कल वॉशिंग्टनच्या सडकेवर उभे राहून चवली-पावलीला विकणाऱ्या ट्रम्प आणि त्यांच्या होयबांना हे कोण सांगणार. अमेरिकेतील हे अवलक्षण जेव्हा कळसाला गेले आणि आपले हत्यार बूमरँग सारखे आपल्यावरच उलटणार असे दिसले. तेव्हा या ट्रम्पने घेतलेली ही तात्पुरती कोलांटउडी आहे. आपण आकारलेल्या आयात शुल्काला नव्वद दिवसासाठी थांबवलेले आहे, अशी मखलाशी त्यांच्याकडून करण्यात आली. आता हे 90 दिवस झाल्यावरही ट्रम्प महाशयांना पुढे आपला हेका चालवता येणार नाही, असे स्पष्ट दिसते. सध्या 'पडलो तरी माझी टांग वरच' या न्यायाने याच ट्रम्पाने चीनच्या आयात शुल्कावर स्थगिती दिलेली नाही. ट्रम्पला आपण किती शक्तिशाली आहोत. हे दाखवण्यासाठी चीनला त्यांनी चिमटा काढलेला आहे. चीन आज जगात सर्वात अधिक प्रगती केलेला देश आहे. हे मान्य करावेच लागेल. जी वस्तू तयार करायला अमेरिकेला शंभर रुपये खर्च येतो. तीच वस्तू चीन अवघ्या 25 रुपयात तयार करतो. ही वस्तुस्थिती आहे आणि हे सर्व खरे आहे. पण या अशा उचापती करून जगाचे जाऊ द्या. पण आपल्याच अमेरिकेतही आपली पत दिवसेंदिवस घसरत आहे. हे दिसल्यावर आता अमेरिका 90 दिवसानंतरही पुन्हा हे धाडस करील असे वाटत नाही. उतावळ्या ट्रम्पच्या प्रत्येक चालीसाठी चीन जवळ उत्तर आहे. चीन जवळ अमेरिकेच्या 850 अब्ज डॉलरच्या कर्जरोख्यांचे भांडार आहे. हे कर्जरोखे चीनने विकायला सुरुवात केली. तर अमेरिकेची अर्थव्यवस्था धोक्यात येऊ शकते. हे सर्व गणित चीनच्या चाणाक्ष जिनपिंगला बरोबर समजून उमजलेले आहे. हाच जिनपिंग जीनचा एक घोट घेऊन ट्रम्पच्या नरडीचा सहज घोट घेऊ शकतो. कारण सध्या अशीच परिस्थिती आहे. जेव्हा जिनपिंग असे करील. तेव्हा मात्र अमेरिकेमध्ये मोठे चिंगपोंग होईल, हे सांगायला कोणाचीच गरज नाही. ट्रम्प सारखा नादान गोंधळी गोंधळ घालून घालून थकलेला आहे आणि आता अमेरिकेलाही नमवता येते, हे सगळ्या जगाला कळून चुकलेले आहे. झाकली मूठ सव्वा लाखाची होती. ती या ट्रम्पाने उघडली आणि परिस्थिती बिघडली. आता अमेरिकेचे विकासपुरुष ट्रम्प यांचे अश्रू पुसायला आपल्या भारतीय अर्थमंत्र्यांनी जावे, एवढीच आमची सूचना आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# राष्ट्रीय तपास संस्थेला लागेल ती मदत करणार

### मुख्यमंत्री फडणवीसांची ग्वाही



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :
मुंबई हल्ल्यातील मुख्य आरोपी तहव्वूर राणाला अमेरिकेतून गुरुवारी रात्री भारतात आणण्यात आले. त्यानंतर त्याला तिथून एनआयएच्या मुख्यालयात नेण्यात आले व त्यानंतर कोर्टात हजर करण्यात आले. या प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली प्रतिक्रिया देत आनंद व्यक्त केला आहे. भारत सरकारने यशस्वीपणे तहव्वूर राणाला भारतात आणले याचा मला आनंद आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, सर्वप्रथम मला अतिशय आनंद होत आहे की मुंबई हल्ल्यातील हल्लेखोरांना तसेच या हल्ल्याचे षड्यंत्र रचणाऱ्या तहव्वूर राणाला भारत सरकारने यशस्वीपणे भारतात आणले आहे. आता त्याला आपल्या देशातील न्यायव्यवस्थेला सामोरे जावे लागणार आहे.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी असे समजतो की आपल्यावर एक तणाव होता की आपण कसाबला तर फाशी दिली, परंतु या हल्ल्याचे षड्यंत्र रचणारा अजून बाकी आहे. आता त्याला देखील भारतात आणण्याचे काम भारत सरकारने केले आहे. यासाठी मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो. विशेषतः त्या समस्त मुंबईकरांतर्फे ज्यांनी आपल्या प्रियजनांना या हल्ल्यात गमावले आहे.

आता तपासाच्या बाबतीत बोलायचे झाले तर, हे प्रकरण एनआयए लीड करत आहे. एनआयएची संपूर्ण टीम यात विचारपूस करत आहे. या तपासात महाराष्ट्र सरकारकडून तसेच मुंबई पोलिसांकडून एनआयएला जी कुठली मदत लागेल ती सर्व मदत आम्ही पुरवू, असेही यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक्स वर लिहिले, देशातील सर्वात मोठ्या २६/११ दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार तहव्वुर राणा याला भारतात आणण्यात आले आहे. यासाठी मी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो. मोदीजी आणि अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्यात सुमारे एक महिन्यापूर्वी चर्चा झाली होती.

त्यांच्या मते, अमेरिकेने भारतातील सर्वात मोठ्या गुन्हेगाराला हद्दपार केले. यासाठी मी भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांचेही अभिनंदन करतो. जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीवरील हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या तहव्वुर राणाला कठोर शिक्षा होईल यात शंका नाही.

## चीन म्हणतो.. झुकेगा नही!

### अमेरिकेवर लादला १२५% टॅरिफ




■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ११ :
अमेरिका आणि चीनमधील टेरिफ वॉर वाढत आहे. अमेरिकेने १४५% कर लादल्यानंतर, चीनने आता १२५% कर लादला आहे. उद्यापासून याची अंमलबजावणी होईल. अमेरिकेने लादलेल्या कोणत्याही अतिरिक्त शुल्काला आता ते प्रतिसाद देणार नाही, असे चीनने म्हटले आहे.

अमेरिकेने लादलेले असामान्य शुल्क आंतरराष्ट्रीय आणि आर्थिक व्यापार नियमांचे गंभीर उल्लंघन करते, असे चीनने म्हटले आहे. हे दबाव आणि धमकीचे पूर्णपणे एकतर्फी धोरण आहे.

अमेरिकेसोबतच्या वाढत्या टेरिफ वादाच्या पार्श्वभूमीवर चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी पहिल्यांदाच विधान केले आहे. ते म्हणाले की, चीन कोणालाही घाबरत नाही. गेल्या ७० वर्षात चीनचा विकास हा कठोर परिश्रम आणि स्वावलंबनाचा परिणाम आहे. चीन कधीही इतरांच्या दानधर्मावर अवलंबून राहिलेले नाही. किंवा मी कधीही कोणाच्या बळाला घाबरलो नाही. जग कितीही बदलले तरी चीनला काळजी नाही, असे त्यांनी खडसावून सांगितले.

## महाराष्ट्रात उष्माघाताचा दुसरा बळी

### उष्णतेचा कहर वाढला, आरोग्य प्रशासन अलर्ट मोडवर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
महाराष्ट्रात तापमान चांगलेच वाढताना दिसत आहे. याचा परिणाम म्हणजे राज्यात उष्माघाताचा दूसरा बळी गेला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील संत गजानन महाराज ज्ञानपीठ येथे शिक्षण घेणारा इयत्ता सहावीतील संस्कार सोनटक्के (12) याचा कडक उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे.

उन्हाचा त्रास होऊ लागल्याने त्याला पालकांनी एका खासगी रुग्णालयात दाखल केले होते. मात्र उपचार घेत असतानाच संस्कारचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे सोनटक्के कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

जिल्ह्यात संस्कार सोनटक्के या विद्यार्थ्यांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची माहिती अकोला जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून बुलढाणा जिल्हा शल्य चिकित्सक यांना कळविण्यात आली आहे.

राज्यात गेल्या महिन्यात उष्माघाताचा पहिला बळी हा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव येथे गेला होता. येथील 25 वर्षीय अमोल दामोदर बावस्कर नामक तरुणाचा उन्हामुळे मृत्यू झाला. सोयगाव तालुक्यातील निमखेड बसस्थानकावर ही घटना 26 मार्च रोजी घडली होती. हा तरुण उन्हात बस थांब्यात विसावा घेत होता. तेव्हा तो अचानक कोसळला. या प्रकरणी सोयगाव पोलिस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेमुळे खडबडून जागे झालेल्या आरोग्य विभागाने जनतेला उन्हापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

## सोने आजवरच्या उच्चांकावर : २९१३ नी वाढून ९३०७४ तोळा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :
११ एप्रिल (शुक्रवार) रोजी सोन्याने सर्वकालीन उच्चांक गाठला आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन (क्क्षखअ) नुसार, २४ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमची किंमत २,९१३ ने वाढून ९३,०७४ झाली आहे. पूर्वी १० ग्रॅम सोन्याची किंमत ९०,१६१ रुपये होती.

आज एक किलो चांदीचा भाव १,९५८ रुपयांनी वाढून ९२,६२७ रुपये प्रति किलो झाला आहे. पूर्वी चांदीची किंमत प्रति किलो ९०,६६९ होती. तर २८ मार्च रोजी चांदीने १,००,९३४ रुपयांचा उच्चांक गाठला होता.

## एमआयएमचे जलील 'मातोश्री'वर

### राजकीय वर्तुळात रंगली चर्चा




■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :
एमआयएमचे नेते तथा छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी आज अचानक मातोश्रीवर जाऊन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांत बराच वेळ चर्चा झाली.

या चर्चेचा तपशील समजला नाही. पण यामुळे राजकीय वतुर्ळात वेगवेगळ्या अटकळी व्यक्त केल्या जात आहेत. दरम्यान, ठाकरे गटाचे नेते तथा विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी जलील आपल्या मुलाच्या लग्नाचे निमंत्रण देण्यासाठी ठाकरेंकडे गेले असतील, असा अंदाज वर्तवला आहे.

अंबादास दानवे यांनी काही दिवसांपूर्वी ईदच्या निमित्ताने इम्तियाज जलाली यांच्या छत्रपती संभाजीनगर येथील निवासस्थानी भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी ईदच्या शुभेच्छा देण्याशिवाय या भेटीत काहीही नवीन नसल्याचा दावा केला होता. या पार्श्वभूमीवर इम्तियाज जलील यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आहे.

## तामिळनाडूमध्ये भाजपची अण्णाद्रमुकशी युती

### २०२६ च्या विधानसभा निवडणुका एकत्र लढण्याची शहांची घोषणा



■ वृत्तसंस्था, चेन्नई, दि. ११ :
केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शुक्रवारी चेन्नईमध्ये अण्णाद्रमुकसोबत युतीची घोषणा केली. ते म्हणाले की, २०२६ मध्ये होणाऱ्या तामिळनाडू विधानसभा निवडणुका अकअउद्ध चे प्रमुख एडाप्पाडी पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखाली लढवल्या जातील. जागांचे वाटप चर्चेनंतर ठरवले जाईल.

शहा म्हणाले की, अण्णाद्रमुकची युतीबाबत कोणतीही मागणी नाही. पक्षाचे एनडीएमध्ये सामील होणे दोघांसाठीही खूप उपयुक्त आहे. पुढील निवडणूक द्रमुक सरकारच्या भ्रष्टाचार, दलित आणि महिलांवरील अत्याचारांच्या आधारावर लढवली जाईल. लोक घोटाळ्यांबद्दल द्रमुककडून उत्तरे मागत आहेत, ते निवडणुकीत या मुद्द्यांवर मतदान करतील.

सप्टेंबर २०२३ मध्ये, तत्कालीन तामिळनाडू प्रमुख अन्नामलाई यांनी केलेल्या काही वक्तव्यांमुळे ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम एनडीएपासून वेगळे झाले होते.


पत्रकार परिषदेत एका प्रश्नाला उत्तर देताना शहा म्हणाले की, काही मुद्द्यांवर एआयएडीएमकेची वेगवेगळी भूमिका आहे. पण आपण बसून यावर चर्चा करू, गरज पडल्यास एक कॉमन मिनिमम प्रोग्राम देखील असेल.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भाजपने सन्मान राखला!

### केंद्रीय राज्यमंत्री अर्जुन मेघवाल यांचे प्रतिपादन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :
संविधान निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कॉंग्रेसने वारंवार अपमान केला. तर भारतीय जनता पक्षाने अनेक कृतींमधून बाबासाहेबांचा सन्मान राखला, असे प्रतिपादन केंद्रीय विधी आणि न्याय राज्यमंत्री अर्जुन मेघवाल यांनी शुक्रवारी येथे केले. विरोधकांनी बाबासाहेब, संविधान आणि भाजपबाबत पसरवलेल्या खोट्या नरेटिव्हला छेद देत कार्यकर्त्यांनी सर्वांपर्यंत सत्य पोहोचवावे, असे आवाहनही त्यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या वतीने आज प्रदेश कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सन्मान अभियान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना मेघवाल यांनी कॉंग्रेसवर टीका केली. भारतरत्न सन्मान, संविधान गौरव यात्रा, पंचतीर्थ तसेच दीक्षाभूमी विकास, सेंट्रल हॉलमध्ये बाबासाहेबांचे तैलचित्र लावणे यांसह अनेक कृतींतून भाजपने बाबासाहेबांप्रति असलेला आदर दर्शवला आहे. कॉंग्रेसने बाबासाहेबांना राज्यघटनेत हव्या तशा तरतुदी करू दिल्या नाहीत, अशा शब्दात त्यांनी कॉंग्रेसवर शरसंधान सोडले.



# पीकविम्याने शेतकरी कंगाल... कंपन्या मात्र मालामाल !



## महाराष्ट्रात दहा हजार पाचशे कोटींचा नफा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११:** पीकविम्यातून शेतकरी कंगाल, तर कंपन्या आर्थिकदृष्ट्या मालामाल झाल्याचे समोर आले आहे. पीकविमा नफ्यातून कंपन्यांना देशभरात तब्बल 50 हजार कोटींच्या खिरापतीचा लाभ मिळालाय.

एकट्या महाराष्ट्रातून या कंपन्यांना तब्बल साडेदहा हजार कोटींचा नफा झाल्याचे समजते. विशेष म्हणजे केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने दिलेल्या माहितीतून हे पितळ उघडे पडले आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी देशोधडीला लागतो. अतिवृष्टी, पूर, वादळी वारे, भूस्खलन सारख्या नैसर्गिक संकटामुळे पिकांचे नुकसान होते. यातून शेतकरी सावरावा यासाठी केंद्र सरकारने 2016-2017 पासून पंतप्रधान पीकविमा (पीएमएफबीवाय) सुरू केली. मात्र, या योजनेच्या हेतूलाच हरताळ फासला असून, पीकविमा कंपन्याच मालामाल होत असल्याचे समोर येत आहे.

नैसर्गिक संकट, अवकाळी पाऊस, ओला दुष्काळ, पिकांवर पडणारे रोगांमुळे अनेकदा हातातोंडाशी आलेले पीक शेतकऱ्यांच्या घरी येत नाही. त्यामुळे या नुकसानीची भरपाई मिळावी म्हणून पंतप्रधान पीकविमा योजना सुरू करण्यात आली. या योजनेत विमा हप्त्याच्या 2 टक्के / नगदी पिकांसाठी 5 टक्के रक्कम शेतकऱ्यांना भरावी लागते. याचा बोजाही शेतकऱ्यांवर न ठेवता त्यांना केवळ एक रुपया भरून विमा पोर्टलवर पीकविम्याची नोंदणी करता येते. मात्र, या योजनेत अनेक घोटाळे झाल्याचे आरोप झाले. महाराष्ट्राचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी ही योजना गुंडाळण्याचे संकेतही दिले होते.

पीकविमा योजनेत खरीप हंगामातील 14 पिकांना ही योजना लागू आहे. त्यात भात, ज्वारी, बाजरी, नाचणी, मका, तूर, मूग, उडीद, भुईमूग, सोयाबीन, तीळ, कारळे, कापूस व कांद्याचा समावेश आहे. रब्बी हंगामातील 6 पिके या योजनेत येतात.

त्यात उन्हाळी भात, गहू (बागायत), रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत ), हरभरा, उन्हाळी भुईमूग, रब्बी कांद्याचा समावेश आहे. अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके घेणारे सर्व शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजना ऐच्छिक असून, सर्व पिकांसाठी 70 टक्के जोखीमस्तर ठेवण्यात आला आहे.

पंतप्रधान पीकविमा योजनेची महाराष्ट्रात 2016-2017 पासून लागू झाली. विमा कंपन्यांना 2016-2024 ते आठ वर्षांच्या काळात केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार आणि शेतकऱ्यांकडून एकूण 43 हजार 201 कोटी रुपयांचा विमा हप्ता मिळाला. मात्र, यात कंपन्यांनी भरपाई पोटी 32 हजार 610 कोटी रुपये रक्कम शेतकऱ्यांना वाटली. त्यात कंपन्यांना तब्बल 10 हजार 591 कोटींचा नफा एकट्या महाराष्ट्रातून मिळाला.

**कंपन्यांना प्रचंड लाभ**

महाराष्ट्रात 2020-2021 या वर्षात तर विम्या कंपन्या आर्थिकदृष्ट्या भयंकर गब्बर झाल्या. त्यांनी शेतकऱ्यांना फक्त 25 टक्के रक्कम भरपाई म्हणून दिली. तर विमा कंपन्यांचा नफा 75 टक्क्यांवर गेला. विमा कंपन्यांना या वर्षात केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार आणि शेतकऱ्यांकडून एकूण 5 हजार 806.21 कोटी रुपयांचा विमा हप्ता मिळाला. या कंपन्यांनी फक्त 1 हजार 431.34 कोटी रुपये रक्कम शेतकऱ्यांना वाटली. त्यामुळे कंपन्यांना एकाच वर्षात 4 हजार 374.87 कोटी रुपयांचा फायदा झाला.

विमा कंपन्यांना 2023-24 मध्ये 29505.82 कोटी विमा हप्ता मिळाला. कंपन्यांनी 16,504.54 कोटी भरपाई रक्कम दिली. त्यानंतर कंपन्यांना 13,001.28 कोटींचा फायदा झाला.

2022 मध्ये 23,31,115.17 कोटी विमा हप्ता मिळाला. कंपन्यांनी 18,385.14 कोटींची भरपाई दिली. त्यानंतर कंपन्यांना 12,730.03 कोटींचा नफा झाला.

2021 मध्ये 22,30,035.19 कोटी विमा हप्ता मिळाला. कंपन्यांनी 20,850.69 कोटींची भरपाई दिली. त्यानंतर कंपन्यांना 9,184.5 कोटींचा फायदा झाला.

2020-21 मध्ये 31,665.53 कोटींचा विमा हप्ता मिळाला. कंपन्यांनी 21,225.05 कोटींची भरपाई दिली. त्यानंतर कंपन्यांना 10,440.48 कोटींचा नफा झाला.

विमा कंपन्यांना 2019 मध्ये 20,32,269.86 कोटींचा विमा हप्ता मिळाला. कंपन्यांनी 27,913.30 कोटींची भरपाई दिली. त्यानंतर कंपन्यांना 4,348.56 कोटींचा फायदा झाल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे.

## आमदारांचे, अधिकाऱ्यांचे पगार थांबवा

### रोहित पवारांची सरकारकडे मागणी



■ **मुंबई :** सरकारकडे एसटीला द्यायला पैसे नसतील तर आमदारांचे, मोठ्या अधिकाऱ्यांचे पगार थांबवा, पण एसटी कर्मचाऱ्यांचे पगार आधी करा, अशी मागणी राष्ट्रवादी काँगेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे.

एसटी कर्मचाऱ्यांना निम्मा पगार देण्यात आला आहे. यावरुन त्यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. त्याच बरोबर पीक विम्याच्या पैशांवरून त्यांनी टीका केली आहे.

रोहित पवार यांनी दोन पोस्टच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अर्थमंत्री अजित पवार यांना प्रश्न विचारला आहे. पिकाचे नुकसान झालं तरी शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळत नाही, असा आरोपही त्यांनी केला आहे. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून केवळ विमा कंपन्यांचे उखळ पांढरं होत असेल तर या पीक विमा योजनेला चाटायचं का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, या महिन्याची १० तारीख आली तरी पगार होत नाहीत, या महिन्यात तर केवळ ५५% पगार म्हणजे २०००० पगार असेल तर केवळ ११००० पगार झाला. एसटी कर्मचा?यांनी निम्म्या पगारात घर चालवायचं तरी कसं? अर्थमंत्री आणि मुख्यमंत्री यावर बोलतील, ही अपेक्षा! सरकारकडे एसटीला द्यायला पैसे नसतील तर आमदारांचे, मोठ्या अधिकाऱ्यांचे पगार थांबवा, पण एसटी कर्मचाऱ्यांचे पगार आधी करा.

## सेन्सॉर बोर्डाकडून जात व्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न

■ **मुंबई :** थोर समाजसुधारक महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या दाम्पत्याच्या जीवनावर आधारित फुले नावाच्या हिंदी सिनेमावरुन सध्या वाद सुरु आहे. पुण्यातील ब्राह्मण महासंघाने या सिनेच्या ट्रेलरमधील काही दृश्यांवर आक्षेप घेतले आहेत. त्यामुळे सेन्सॉर बोडार्ने या चित्रपटातील अनेक सीन व संवाद कापण्याचे निर्देश दिलेत. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सेन्सॉर बोर्डावर टीकेची झोड उठवली आहे. जातीवाद्यांनी भरलेल्या सेन्सॉर बोडार्ने आपल्या सवयीप्रमाणे इथली जातव्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न केला, असे ते या प्रकरणी म्हणाले.

## मंगेशकर कुटुंबीयांनी दोन्ही मुलींचे मातृत्व स्वीकारावे -अमित गोरखे

■ **पुणे :** भाजप आमदार अमित गोरखे यांनी मंगेशकर कुटुंबीयांना मृत तनिषा सुशांत भिसे यांच्या दोन्ही मुलींचे त्या 18 वर्षांच्या होईपर्यंत मातृत्व स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे काम पूर्वीपासून चांगले आहे. पुढेही ते असेच करत राहतील. परंतु, डॉक्टर सुश्रुत घैसास यांच्याकडून चूक झाली. त्यांनी स्वतः राजीनामा दिला आहे. आमच्यासाठी त्यांचा राजीनामा महत्त्वाचा नाही. डॉक्टर घैसास असतील किंवा इतर त्यांच्यावर गुन्हा दाखल झालाच पाहिजे. पण मंगेशकर कुटुंबीयांनी सामाजिक भान ठेवून त्या दोन मुलींचे मातृत्व त्या 18 वर्षांच्या होईपर्यंत घेतले पाहिजे. कारण, अशा घटनांमध्ये संस्था जबाबदार असते, असे गोरखे यांनी म्हटले आहे.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आमदार अमित गोरखे यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांनी त्यांच्यावर आपल्या भूमिकेवरून यु टर्न घेतल्याचा आरोप केला आहे. भाजपचे आमदार अमित गोरखे यांचे आपल्या भूमिकेवरून यु टर्न घेण्याचे कारण काय? गोरखे यांच्यावर कोणाचा दबाव आहे का? गोरखे यांना कुणी, काही आदेश दिले आहेत का? असे विविध प्रश्न राज्याच्या जनतेच्या मनात निर्माण होत आहेत. पडद्यामागे काही घडत असेल की नाही याची कल्पना नाही. पण एका आईने जीव गमावला आहे याचा संवेदनशीलपणा ठेवायला हवा, असे त्यांनी म्हटले आहे.

## चौघांकडून एकाची शस्त्राने भोसकून हत्या

**मुंबई :** गेली काही दिवस राज्यातील गुन्हेगारीच्या घटनामध्ये मोठी वाढ होताना दिसून येत आहे. यातच मुंबईमधून दोन धक्कादायक घटना समोर आल्या आहेत. यात जागेच्या वादातून एका व्यक्तीची हत्या करण्यात आली आहे. तर दुसऱ्या घटनेत पूर्ववैमनस्यातून भावानेच आपल्या बहिणीचे कुंकू पुसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

मुंबईच्या वांद्रे परिसरात दर्ग्याच्या जागेच्या मालकी हक्कावरुन 46 वर्षीय व्यक्तीचा निर्घुण खून करण्यात आला आहे. गुरुवारी सायंकाळी शाकिर अली शेख या व्यक्तीची 4 जणांनी धारदार शस्त्राने भोसकून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी 4 आरोपींना ताब्यात घेतले आहे.

इमरान नासीर खान, उस्मानअली जाकिर अली शेख, जाकीर अली शेख, फातिमा उर्फ कायनात इमरान खान अशी ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. चौघांविरोधात वांद्रे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नागपाड्यातही दुसरा खून**

दुसरीकडे मुंबईतील नागपाडा परिसरातील पूर्ववैमनस्यातून मेव्हण्यानेच बहिणीच्या नवऱ्याची हत्या केल्याची घटना घडली आहे. अजित खारवा हे आपल्या मुलांसह खरेदीसाठी घरातून बाहेर पडले होते. यावेळी त्यांचा मेव्हणा आपल्या मुलांसह त्यांच्याकडे आला. यावेळी दोघांमध्ये वाद झाला काहीच क्षणात शाब्दिक वाद वाढत गेला आणि विजय चतुर खारवा याच्यासह मुलाने अजित खारवा यांच्यावर धारदार शस्त्रांनी सपसप वार केले.यात अजित खारवा यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी जे जे रुग्णालयात पाठवला आहे. या प्रकरणी नागपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तर पुलवामा हल्ल्याचेही क्रेडिट घ्या... खा. राऊत

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११:** अमेरिकेतून प्रत्यार्पण करण्यात आलेल्या तहव्वूर राणा अटकेवरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपला खडेबोल सुनावलेत. मुंबई हल्ल्यातील प्रमुख आरोपी असणाऱ्या तहव्वूर राणाला भारतात आणल्याप्रकरणी प्रशासन व तपास यंत्रणांचे कौतुक करण्याची गरज आहे. या प्रकरणी भाजपने क्रेडिट घेण्याचा प्रयत्न केला, तर त्यांना पुलवामा हल्ल्याचेही क्रेडिट घ्यावे लागेल, असे ते म्हणाले.



संजय राऊत म्हणाले, तहव्वूर राणाला भारतात आणल्यानंतर एवढे क्रेडिट घेणाऱ्या भाजपवाल्यांना माहिती पाहिजे की, यापूर्वीही अनेकांना भारतात अशाच प्रकारे आणण्यात आले आहे. यापूर्वी अबू सालेमला भारतात आणण्यात आले. राणाला आणण्यासाठी भारत सरकार 2009 पासून सातत्याने प्रयत्न करत आहे. 2009 साली राणा व हेडली विरोधात एनआयएने पहिला एफआयआर दाखल केला.

एनआयएच्या पथकाने शिकागोला जाऊन राणा व हेडलीची चौकशी केली. 2012 साली तत्कालीन परराष्ट्र मंत्री सलमान खुर्शीद स्वतः अमेरिकेला गेले आणि राणाला भारतात आणण्याच्या मुद्द्यावर तेथील नेत्यांशी चर्चा केली. पंतप्रधान मोदींना घ्यायला त्या दिवशी ट्रम्प व्हाईट हाऊसच्या बाहेर देखील आले नाहीत. काहीही बोलता का तुम्ही? राणाला कायदेशीर प्रक्रियेद्वारे आणण्यात आले आहे. हे आपल्या भारत सरकारचे यश आहे. परराष्ट्र खात्याचे यश आहे. त्याचा कोणत्याही पक्षाशी संबंध नाही.

ते पुढे म्हणाले, तहव्वूर राणा हा मुंबईवरील हल्ल्यातील एक प्रमुख आरोपी आहे. त्याचे अमेरिकेहून भारतात प्रत्यार्पण करण्यात आले. या प्रकरणी प्रशासन व तपास यंत्रणांचे कौतुक झाले पाहिजे. यासंबंधी तहव्वूर राणाचा फेस्टिव्हल करण्याची काही गरज नाही. भाजपने या प्रकरणी क्रेडिट घेण्याचा प्रयत्न केला, तर त्याला पुलवामा हल्ल्याचेही क्रेडिट घ्यावे लागेल. कुलभूषण जाधव यांना परत आणावे लागेल. मेहूल चोक्सी व नीरव मोदी यांनाही घेऊन यावे लागेल.

संजय राऊत यांनी यावेळी वक्फ दुरुस्ती विधेयकावरूनही भाजपवर निशाणा साधला. भाजप कोणताही निर्णय मुहूर्त पाहून घेते. अमेरिकेने ज्या दिवशी टॅरीफची घोषणा केली, त्या दिवशी त्यांनी वक्फ दुरुस्ती विधेयक आणले. आता बिहार व पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या अगोदर राणाला फासावर चढवतील. राणाला फासावर लटकवण्यासाठी आणले आहे की, क्रेडिट घ्यायला आणले आहे? हे आधी स्पष्ट करावे, असे ते म्हणाले.

## माझा स्वभाव तसाच.. मी परखड

### कानउघाडणीनंतरही कोकाटेंची विधाने सुरूच

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ११:** राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकरी आणि कर्जमाफीबद्दल केलेल्या विधानामुळे चांगलाच वाद निर्माण झाला. विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर शेवटी कोकाटे यांना दिलगिरी व्यक्त करावी लागली. विशेष म्हणजे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोकाटे यांना तंबी दिल्याचंही म्हटलं जाते.



असे असतानाच आता कोकाटे यांनी त्यांच्या वादग्रस्त विधानांबाबत भाष्य केलंय. माझा असा स्वभाव जन्मजात आहे. माझा हेतू स्वच्छ आहे, असे कोकाटे म्हणाले आहेत. ते पुण्यात पत्रकार पत्रकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं देत होते.

माणिकराव कोकाटे म्हणाले, माझा स्वभाव जन्मजात आहे, तो एका दिवसात बदलणार नाही. पण माझा हेतू स्वच्छ आहे. कोणत्याही विधानाच्या आडून काही साध्य करायचा माझा उद्देश नाही,ह्यअसे कोकाटे यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले. तसेच मी परखड सत्य बोलतो. माझा स्वभाव कडक असला तरी माझा हेतू शेतकऱ्यांचे भले करण्याचा आहे. नवी पिढी शेती व्यवसायात यावी, कमी खर्चात जास्त उत्पादन काढावे, यासाठी मी काम करत आहे असेही कोकाटे यांनी सांगितले.

मागील काही दिवसांपासून कोकाटे यांच्या शेतकऱ्यांविषयीच्या वक्तव्यांमुळे वादंग निर्माण झाले होते. कर्जमाफीच्या पैशांचा वापर शेतकऱ्यांनी लग्नकार्यासाठी केल्याचा दावा त्यांना केला होता. त्यांच्या या विधानानंतर त्यांच्यावर सडकून टीका झाली होती. अजित पवार यांनी पक्षाच्या बैठकीत कोकाटे यांना फटकारल्याचे म्हटले जाते. तिसऱ्यांदा चूक झाली तर मंत्रिपद धोक्यात येईल, असा कठोर इशाराही दिला होता.

**कोकाटे यांचं नवं विधान**

कांद्याचे भाव पडल्यामुळे एकीकडे शेतकरी हवालदिल आहेत. असे असतानाच कोकाटे यांनी कांद्याचे बाजारभाव का पडतात, याबाबत भाष्य केलं आहे. एखाद्या शेतकऱ्याला कांद्याच्या बाजारभावाचा फायदा झाला म्हणून बाकी सगळे कांदा लावत सुटतात. कांद्याची लागवड किती करावी यालाही मर्यादा आहेच, दुप्पट, तिप्पट ठीक पण पन्नास पटीने कांद्याची लागवड करायला लागले तर कांद्याचे बाजारभाव पडणारच, असे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे म्हणालेत.

## पैशांवरून परिवहन आणि वित्त खात्यात जुंपली

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११:** एसटी कर्मचाऱ्यांच्या थकित पगाराच्या मुद्यावरून परिवहन व वित्त विभागामध्ये चांगलीच जुंपल्याची चिन्हे आहेत.



परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकारांशी संवाद साधताना आमच्या विभागाकडून गेलेली फाईल वित्त खात्याच्या अधिकाऱ्याकडून परस्पर आमच्या विभागाकडे पाठवली जाते असे ते म्हणालेत. एसटी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांसारखा पगार मिळाला पाहिजे. आम्ही वित्त खात्याकडे भिक नाही तर आमचा अधिकार मागत आहोत, असेही ते यावेळी म्हणालेत.

प्रताप सरनाईक म्हणाले, एसटी महामंडळाच्या 87 हजार कर्मचाऱ्यांचा प्रश्न काल माध्यमांद्वारे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचला. ही वस्तुस्थिती आहे की, आम्ही 928 कोटींची मागणी अर्थ खात्याकडे केली होती. परंतु आम्हाला 272 कोटी मिळाले. त्यातून आम्हाला एसटी कर्मचाऱ्यांचा पगारही व्यवस्थितपणे करता आला नाही.

आजपर्यंत काही गोष्टी घडल्या होत्या. पण मी माझ्या अधिकाऱ्यांना एसटी कामगारांचे पगार महिन्याच्या 7 तारखेच्या आत करण्याचे निर्देश दिलेत. या प्रकरणी वित्त विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून कुठल्याही परिस्थितीत आपल्या खात्यात कर्मचाऱ्यांच्या पगाराचे, भविष्य निर्वाह निधीचे व बँकेचे पैसे आले पाहिजेत.

आमच्या कर्मचाऱ्यांना दरमहा 30-50 हजार रुपयांचा पगार आहे. त्यातून कर्मचारी कसेबसे आपले घर चालवतात. त्यामुळे त्यांना वेळेवर पगार मिळाला नाही, तर महाराष्ट्राची वास्तविकता काल एसटी कामगारांना दिलेल्या 56 टक्के पगारातून दिसून आली. त्यानंतर ताबडतोब मी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सर्व संबंधित लोकांशी बोललो. शिंदे साहेबांनी वित्त खात्याच्या प्रधान सचिवांशी संवाद साधून उर्वरित पगार मंगळवारपूर्वी देण्याच्या सूचना केल्या. परंतु हा प्रश्न केवळ या महिन्याचा सुटला. पण असे प्रश्न सातत्याने उद्भवले तर ती योग्य गोष्ट नाही.

ते पुढे म्हणाले, शासकीय कर्मचाऱ्यांना जसा वेळेवर पगार मिळतो, तसाच पगार एसटी कर्मचाऱ्यांनाही मिळाला पाहिजे. ही वित्त खात्याची जबाबदारी आहे. आम्ही आमचा अधिकार मागतो. हा अधिकार वेळेवर मिळत नसेल तर ते अयोग्य आहे. मी वित्त खात्याच्या अधिकाऱ्यांशी बोललो होतो की, कोणतीही अवास्तव मागणी करत नाही. जे आमचे स्वतःचे आहे, ते आम्हाला वेळेवर मिळत नसेल तर ही शोकांतिका आहे.

**आमची फाईल परस्पर परत पाठवली जाते**

आमच्या विभागाकडून गेलेली फाईल वित्त खात्याच्या अधिकाऱ्याकडून परस्पर आमच्या विभागाकडे पाठवली जाते. ही फाईल वित्त खात्याच्या मंत्र्यापर्यंत जात नाही ही फार मोठी शोकांतिका आहे. अजित पवारांनी मी मंत्री झाल्यानंतर मला बोलावून एसटीची स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना करण्याचा शब्द दिला होता. तेव्हा मी त्यांना जुन्या 12 हजार 400 बसेसची अवस्था फार वाईट असल्याचे सांगितले होते. विशेषतः या प्रकरणी 2-4 हजार नव्या बसेस घेऊन चालणार नाही तर तब्बल 25 हजार बस 5 वर्षांत घ्याव्या लागतील असे मी त्यांना सांगितले होते, असेही सरनाईक म्हणाले.

## ...तर ठाकरे, शरद पवार रस्त्यावर उतरले असते!

### प्रकाश आंबेडकर यांची टीका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११:** महात्मा ज्योतिराव फुले हे ओबीसी होते. ते जर मराठा असते तर त्यांचा अपमान झाल्यानंतर काँग्रेस, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांचा पक्ष रस्त्यावर उतरला असता, अशा शब्दात प्रकाश आंबेडकर यांनी महा विकास आघाडीवर टीका केली आहे.



महात्मा ज्योतिराव फुले यांच्यावर आधारित चित्रपटाला सेन्सॉर बोडार्ने कात्री लावली आहे. या विरोधात वंचित बहुजन आघाडी चांगलीच आक्रमक झाली आहे. या संदर्भात प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वात आंदोलन देखील करण्यात आले.

प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, दिल्लीतील एका प्रिंट पत्रकाराने मला फोन करून विचारले की काँग्रेस, शिवसेना (उद्धव) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) महात्मा फुले आणि सावित्रीबाई यांच्या अवमानावर गप्प का आहेत. ते म्हणाले, "हे सर्व लोक वंचित बहुजन आघाडीसारखे निषेध का करत नाहीत?" त्यांच्या अगदी योग्य प्रश्नावर मी उत्तर दिले.

"कारण महात्मा फुले हे ओबीसी होते. जर ते मराठा असते तर काँग्रेस, शिवसेना (उद्धव) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) रस्त्यावर उतरले असते. जोतिबा फुले आणि सावित्रीबाई माळी जातीच्या (उत्तर भारतातील सैनी जातीच्या) होत्या आणि म्हणूनच महाविकास आघाडी त्यांच्या अपमानाचा निषेध करत नाही!"

'आज नव्याने आलेली गुलामगिरी थोपवायची असेल तर महात्मा फुलेंनी दाखवलेल्या मार्गाशिवाय पर्याय नाही. देशातल्या तमाम वंचित समूहांना ब्राह्मणवाद्यांनी लादलेल्या जातीयवादी व्यवस्थेच्या 'गुलामगिरी'ची जाणीव करून दिली. म. फुले यांनी फक्त अन्यायाविरुद्ध बंड पुकारले नाही, तर त्याला नवीन पर्यायी व्यवस्था ही दिली.

वंचित, शोषित, पीडितांसाठी समतेची दारे उघडली. अस्पृश्यांसाठी आपल्या घरातील पाण्याचा हौद खुला करून इथल्या जातिव्यवस्थेवर प्रहार केला. सावित्रीमाईंसोबत त्यांनी शिक्षणाची मशाल पेटवून इथल्या समाजक्रांतीचा पाया रचला. सामाजिक क्रांतीचे प्रणेते, छत्रपती शिवरायांची समाधी शोधून त्यांच्यावर पहिल्यांदा पोवाडा लिहिला.

त्यांच्याच विचारांवर आपल्याला पुढे जातांना समतेची मूल्य अजून बळकट करूया आणि इथल्या शोषित, पीडित, वंचितांचा आवाज बुलंद करूया, हेच महात्मा फुले यांना जयंती निमित्त अभिवादन असेल! जय फुले, जय शाहू, जय भीम!!!'

## ..तर मोठा उठाव!

### शिंदेसेनेच्या नेत्याचा इशारा

■ **वृत्तसंस्था, रायगड, दि. ११:** कॅबिनेट मंत्री भरत गोगावले यांना रायगड जिल्ह्याचे पालकमंत्रिपद मिळाले नाही, तर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या दौऱ्यापूर्वीच मोठा उठाव होईल, असा निर्वाणीचा इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांनी दिला आहे.



केंद्रीय गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्राच्या 2 दिवसीय दौऱ्यावर आले आहेत. ते शनिवारी रायगड किल्ल्याला भेट देणार आहेत. या पार्श्वभूमीवर महेंद्र दळवी यांनी उपरोक्त इशारा दिला आहे.

महेंद्र दळवी यासंबंधी बोलताना म्हणाले की, बंद दाराआड चर्चा करण्याची काहीच गरज नाही. भरत गोगावले यांना पालकमंत्रिपद मिळेल याविषयी आम्ही सर्व रायगडवासी आशावादी आहोत. खरे तर या प्रकरणी अगोदरच खूप उशीर झाला आहे. प्रोटोकॉलनुसार गोगावले हे 4 टर्मचे आमदार आहेत. त्यामुळे त्यांना हे पद मिळणे अपेक्षित आहे. सुनील तटकरे यांचा नेहमीच हव्यास असतो. पण आता गोगावले यांना रायगडचे पालकमंत्रिपद मिळाले नाही तर भविष्यात मोठा उठाव होईल. अमित शहांच्या दौऱ्यात आम्हाला न्याय मिळेल असे वाटत असल्याचे दळवी यावेळी म्हणाले.

## भैरवनाथ तालीम मध्ये विक्रमी २१०० दिवे प्रज्वलित



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ११:** भारतीय खेळाडूंना ऑलिम्पिकमध्ये पदके मिळवायची असतील, तर "खेलो इंडिया" या प्रकल्पातून जास्तीत जास्त युवा खेळाडूंनी सहभाग घेऊन आपली क्षमता सिद्ध केली पाहिजे. यातून पुढे आलेले खेळाडू जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर खेळून अनुभव मिळवतील. हा अनुभव, सराव आणि योग्य प्रशिक्षक, मार्गदर्शकाच्या सल्ल्याने खेळाडूंना नक्की यश मिळेल, असे प्रतिपादन पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांनी केले.

भैरवनाथ तालीम येथे पै. विजय नारायण नखाते यांच्या नेतृत्वाखाली आखाड्यामध्ये एकाच वेळी २१०० तेलाचे दिवे प्रज्वलित करून जागतिक विक्रम करण्यात आला. या विक्रमाची नोंद "इंटरनॅशनल वर्ल्ड रेकॉर्ड" मध्ये घेण्यात आली. त्याचे प्रमाणपत्र पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांच्या हस्ते पै. विजय नखाते यांना देण्यात आले.

# महासागर अकोला

•शनिवार,दि.१२ एप्रिल २०२५

पान 3


## उन्हामुळे शाळेच्या वेळेत बदल जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**अकोला** : जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात तापमानात वाढ झालेली आहे. शालेय विद्यार्थ्यांना उष्माघाताचा त्रास होऊ नये म्हणून शाळांच्या वेळेत बदल करण्याचे आदेश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी निर्गमित केले आहेत.

मागील आठवड्यात जिल्ह्यातील तापमानाची नोंद ४४ अं. से. पर्यंत झाली आहे. तापमानाचा पारा चढता असल्यामुळे उष्णतेची लाट निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उष्माघाताचा धोका निर्माण झाला असुन, त्याचा त्रास शालेय विद्यार्थ्यांना होऊ नये, यासाठी हा बदल करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांची वेळ सकाळच्या सत्रात– प्राथमिक शाळांसाठी सकाळी ०७ ते ११.१५ व माध्यमिक शाळांसाठी ७.०० ते १ अशी निश्चित करावी, असे आदेशित करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना उष्णतेच्या लाटेपासुन बचाव करण्यासाठी माहिती द्यावी. विद्यार्थ्यांच्या मैदानी, शारिरीक हालचाली टाळाव्यात. बाहेर मैदानामध्ये वर्ग घेऊ नये. वर्गामध्ये पंखे सुस्थितीत असल्याबाबत खात्री करावी. विद्यार्थ्यांकरिता स्वच्छ पाणी उपलब्ध असावे. त्यांना पातळ, सैल, सुती आणि शक्यतो हलक्या रंगाचे कपडे परिधान करण्याची मुभा देण्यात यावी. टोपी किंवा इतर पारंपरिक साधनांचा वापर करण्याबाबत सुचना द्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## सातकलमी कृती कार्यक्रमाचा आढावा तक्रारींचा १०० टक्के निपटारा करा : जिल्हाधिकारी



■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) : सातकलमी कृती कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करतानाच, जिल्हा लोकशाहीदिन व आपले सरकार पोर्टलवर प्राप्त तक्रारींचा संबंधित सर्व विभागांनी १०० टक्के निपटारा करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.

राज्य शासनाच्या १०० दिवस कृती कार्यक्रमात विविध कार्यालयांनी केलेल्या अंमलबजावणीचा ऑनलाईन बैठकीद्वारे आढावा घेताना ते बोलत होते. निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील, उपजिल्हाधिकारी अनिता भालेराव, उपजिल्हाधिकारी निखिल खेमनार, तहसीलदार गौरी धायगुडे यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व इतर यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे (इज ऑफ लिव्हिंग) यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला सात कलमी कृती कार्यक्रम निश्चित करुन दिला आहे. अद्ययावत संकेतस्थळ, सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारीचे निवारण, कार्यालयातील सोयी सुविधा, गुंतवणूक प्रसार आणि क्षेत्रीय कार्यालयांना भेटी या सातही उद्दिष्टांची पूर्तता होणे आवश्यक आहे.

जनतेच्या तक्रारींचे निवारण हा महत्वाचा मुद्दा असून, त्या अनुषंगाने सर्व विभागांनी गांभीर्यपूर्वक कार्यवाही करणे आवश्यक आहे.जिल्हा लोकशाहीदिन उपक्रमात प्राप्त तक्रारींसंबंधी निराकरणाची कार्यवाही संबंधित विभागांनी सोमवारपूर्वी करावी. त्याचप्रमाणे, आपले सरकार पोर्टलवरही काही विभागांच्या तक्रारी प्रलंबित आहेत. राष्ट्रीय महामार्ग विभाग, भूमी अभिलेख, महावितरण आदी विभागांच्या तक्रारी प्रलंबित असल्याचे दिसते. त्यांचा तत्काळ निपटारा करावा.

कामकाजात दुर्लक्ष कराल तर संबंधितांच्या वरिष्ठ स्तरावर कारवाईचा प्रस्ताव पाठविण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.कार्यालयांत सोयी– सुविधा, सर्व माहितीचे अद्ययावतीकरण आदी आवश्यक बाबींची अंमलबजावणी करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## अयोध्या येथे दर्शनासाठी जिल्ह्यातील भाविकांना घेऊन निघाली ट्रेन





■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) : देशाची ओळख प्रभू रामचंद्राच्या नावाने ओळखल्या जाते त्या साकेत धामाचे दर्शनासाठी जिल्ह्यातील ८३४ जेष्ठ नागरिक श्री जानकी वल्लाभो सहकार गौरव विशेष रेल्वे गाडीने क्रांती सूर्य ज्योतिबा फ्रुले यांचे जयंती दिनानिमित्य सामाजिक समरसता सोबत हनुमान जयंती पर्वावर जात असलेले भाविक भाग्यवंत असून आमदार रणधीर सावरकर यांचे पुढाकाराने मुख्यमंत्री जेष्ठ नागरिक तीर्थयात्रा योजनेंतर्गत विशेष रेल्वे गाडी जात असल्याचे आनंद होती असल्याचे प्रतिपादन खासदार अनुप धोत्रे यांनी केले. अकोला रेल्वे स्टेशन वरील फालत नं ३ येथून भारतीय गौरव तीर्थ योजनेंतर्गत महाराष्ट्र सरकारच्या सामाज कल्याण विभागातफ्रे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पुढाकाराने अकोला जिल्ह्यातून विशेष रेल्वे गाडी आमदार रणधीर सावरकर यांचे पाठपुराव्याने अयोध्या धाम येथे रवाना प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी आमदार वसंत खंडेलवाल होते तर या वेळी आमदार रणधीर सावरकर, कामगार आयुक्त सौ. मायाताई केदार, सहाय्यक आयुक्त डॉ. अनितातार्इ राठोड, विजय अग्रवाल, किशोर पाटील जयंत मसने, सळीळीह जोशी, माधव मानकर तहसीलदार सुरेश कावरे तलाठी माहोरे उपस्थित होते.

ग्रामीण आणी शहरातील ८३४ जेष्ठ नागरिकांना कोट्यावधी जनतेचे आराध्य दैवत व अनेक वर्षाचे संघर्षा नंतर पंतप्रधान मोदी यांचे पुढाकाराने विशाल मंदिर उभारणी अयोध्या येथे झाली त्याचे दर्शनासाठी सरकारच्या योजनेचा






लाभ व सरकारचे वतीने सर्व सुविधा उपलब्ध करून देऊन सरकार सर्वांचे असल्याचे कृतीने सिद्ध झाल्याचे प्रतिपादन आमदार सावेअरकर यांनी सांगून आंपण कर्तव्याचे भावनेतून ही रेल्वे सुरु केली असल्याचे त्यांनी सांगितले. हा पहिला जत्था असून जिल्ह्यातील सर्व जेष्ठ नागरिकान यात्रा घडवण्यासाठी प्रयत्नशील राहू असे या वेळी सांगितले या वेळी जय श्रीराम, जय गजानन , हर हर महादेव, भारतमाता की जय, वंदे मातरम चा जयघोशाणे रेल्वे स्टेशन दुमदुमले. या रेल्वेमध्ये पिण्याचे पाण्यापासून भोजनाची व्यवस्था असून १३ डब्यांची गाडी आहे डॉ. ची व्यवस्था असून भाजपा तफ्रे सुद्धा औषधे व डॉक्टरांची टीम सोबत पाठविण्यात आली. या मध्ये रामदरबार दर्शन, संकीर्तन ढोल ताशे तुतारी वाजंत्री पुष्प वृष्टी करून यात्रेकरूंचे स्वागत भाजपा तफ्रे करण्यात आले. या वेळी अंबादास उमाळे, देवाशिष काकड, करण शाहू, अश्विन शुक्ला, पावन महल्ले, संदीप गावंडे, संजय जोशी, दिलीप मिश्र, राजेंद्र सळीळ, उमेश श्रीवास, विपूल घोगले, किशोर कुचके, हेमंत शर्मा विशाल गमे, संदीप गावंडे, देवेंद्र देवर, अमोल साबळे, हर्शल गोंडचवर, मधुकर पाटकर, राजेश ठाकरे, अनिल गावंडे, अरविंद शुक्ला, संतोष डोंगरे, , अंकुश इंगळे, वैभव माहोरे, विठ्ठल चतरकर, धुर्व खुणे, जितेंद्र देशमुख, आनंद बलोडे, नितीन राऊत.

## गौहत्या कटाचे धागे! पोलिसांची जोरदार धडक

### 'बैलांची निर्दयी वाहतूक पकडली–कत्तलखान्याचा माग काढणार!



■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) : अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापुर तालुका अंतर्गत येणाऱ्या जामठी बु. गावाजवळ गुरुवारी (१० एप्रिल २०२५) दुपारी ३ वाजता, कत्तलीसाठी निर्दयीपणे नेले जात असलेले चार गोवंशीय बैल पोलिसांनी वाचवले. गस्तीवर असलेल्या पोलीस पथकाने एम.एच. ३० बी.डी. ५१७९ क्रमांकाची महिंद्रा बोलेरो थांबवून चौकशी केली असता ही धक्कादायक बाब समोर आली.

उपनिरीक्षक गणेश महाजन, अंमलदार संदीप सरोदे आणि पोलीस कॉंस्टेबल जावेद यांच्या पथकाने गाडीची तपासणी केली असता, चार गोवंश जातीचे बैल गाडीच्या मागील भागात अत्यंत अमानुष पद्धतीने बांधलेले आढळले. गाडीचा चालक समीर खान छोटे खान पठाण (वय २४, रा. जामठी बु.) याने बैल कत्तलीसाठी नेत असल्याची कबुली दिली.पोलिसांनी अंदाजे १.१० लाख रुपये किमतीचे बैल व ८ लाख रुपयांची बोलेरो गाडी असा एकूण ९.१० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीवर महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा आणि प्राण्यांवरील निर्दयी वागणूक (कलम ११) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना समोर आल्यानंतर माना पोलीस स्टेशन हद्दीत चोरीछुपे कत्तलखाने कुठे सुरू आहेत, याबाबत संशय वाढला असून या गोवंश तस्करीमध्ये अजून कोणकोण शामिल आहे, याचा सखोल तपास होण्याची गरज निर्माण झाली आहे. या साखळीमागील मुख्य सूत्रधार अद्यापही पोलिसांच्या तावडीतून दूर असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.मागील काही दिवसांत अशा तस्करी प्रकरणांवर कारवाई होऊनही गोमांस तस्करांमध्ये कायद्याचा धाक दिसून येत नाही, ही चिंतेची बाब आहे. ठाणेदार सुरज सुरोशे यांच्या मार्गदर्शनाखाली अंमलदार उमेश हरमकर यांच्याकडून पुढील तपास सुरू आहे.या कारवाईनंतर पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक होत असले, तरी अशा बेकायदेशीर धंद्यांना आळा घालण्यासाठी अधिक कठोर आणि सखोल पातळीवर छापे आणि तपास आवश्यक असल्याची मागणी आता जोर धरत आहे.

## महेर वॉकेथॉनला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) : श्री अकोला गुजराती समाज संचालित श्रीमती महेरबानु कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स अकोला द्वारा आयोजित व इंडियन मेडिकल असो, रेडक्रॉस सोसायटी यांच्या सहकार्याने जागतिक आरोग्य दिनानिमित्त संपूर्ण अकोलेकरांच्या निरोगी आरोग्यासाठी महेर वॉकेथॉन संपन्न झाली.या वॉकेथॉनचा प्रारंभ महेरबानु कॉलेज पासून गुजराती समाज अध्यक्ष दिपेनभाई शहा, आयएमए अध्यक्ष डॉ संतोष कुमार सोमानी यांच्याद्वारे हिरवी झेंडी दाखवून करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ स्मिता शिंगरूप यांनी विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांचा सत्कार करीत कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. ही वॉकेथॉन मुख्य रस्त्यावरून मार्गक्रमण करीत सिव्हिल लाईन येथील आयएमए सभागृह परिसरात याचे समापन झाले.

## थोडक्यात

### ॲड. आंबेडकर यांच्या नेतृत्वात बुद्धगया येथे आंदोलन

**अकोला** : बुद्धगया येथील महाबोधी विशेष रेल्वे महाविहार मुक्त करण्यासाठी ॲड. प्रकाश गाड्या सोडण्याची आंबेडकर यांच्या नेतृत्वामध्ये १६ व वंचितची मागणी १७ एप्रिल रोजी बुद्धगया येथे आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनात अकोला जिल्ह्यातून व लगतच्या जिल्ह्यातून हजारोच्या संख्येने महिला व पुरुष सहभागी होणार आहे. त्यामुळे १५ एप्रिल रोजी अकोला ते बुध्दासाठी सकाळी विशेष रेल्वे सोडण्यात यावी. १७ एप्रिल रोजी बुद्धगया येथून सायंकाळी बुद्धगया–अकोला विशेष रेल्वे सोडण्यात यावी, अशी मागणी वचित बहुजन आघाडी जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, जिल्हा महासचिव मिलिंद इंगळे यांच्या नेतृत्वात रेल्वे स्टेशन प्रबंधक यांना निवेदनातून केली आहे. यावेळी राहुल अहिरे, गजानन गवई, पवन बुटे, गोरसिंग राठोड, किशोर जामनिक, अजय शेगावकर, प्रदीप चौरे, नितीन सपकाळ, पराग गवई, विकास सदाशिव, धीरज इंगळे, प्रदीप पळसपगार, शंकरराव राजूरकर, सुरेश कल्लोरे, शीलवंत शिरसाट, सुयोग आठवले, शरद इंगोले, शुद्धोधन इंगळे, संजय कीर्तक, विश्वजीत इंगळे, रवी सराटे, अजय कांबळे, गोवर्धन सावळे, शेषराव तायडे, अशोक लोणागरे, संदीप सराटे, योगेश भगत, उमेश शिरसाट उपस्थित होते.

## अकोला पोलीस दल नागरिकांसाठी घेऊन आले

## सुलभ आणि जलद संवाद माध्यम– 'अकोला पोलीस व्हॉट्सअॅप चॅटबॉट !






■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) : मा. मुख्यमंत्री १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत राहणीमान, तक्रारींचे निवारण, कामाच्या ठिकाणी सुविधा संबंधीत उपक्रम तसेच स्मार्ट पोलीसींग अंतर्गत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत, अकोला पोलीस दल आता नागरिक आणि पोलीस यांच्यातील संवाद अधिक सुलभ, जलद आणि सोयीस्कर करण्यासाठी एक नवीन डिजिटल माध्यम घेऊन आले आहे –

अकोला पोलीस व्हॉट्सअॅप चॅटबॉट! या आधुनिक सुविधेमुळे नागरिकांना आता पोलीसांकडून पुरविल्या जाणाऱ्या विविध सेवा आणि सुविधा विषयी माहिती मिळवणे अधिक सोपे होणार आहे.आज दिनांक ११/०४/२०२५ रोजी दुपारी ०४ वाजता विजय हॉल येथे मा. श्री. बच्चन सिंह पोलीस अधीक्षक अकोला यांचे हस्ते शुभहस्ते अकोला पोलीस व्हॉट्सअॅप चॅटबॉट! चे अनवारण करण्यात आले. नागरीकांच्या सेवेत अकोला पोलीस दला चे हे एक सकारात्मक पाउल असणार आहे असे मत पोलीस अधीक्षक यांनी व्यक्त केले.

सदर अकोला पोलीस व्हॉट्सअॅप चॅटबॉट चा वापर कसा करावा याबाबत माहीती देण्यात आली. हे चॅटबॉट वापरण्यास अत्यंत सोपे आहे ! आपल्या मोबाईलमधील व्हॉट्सअॅप उघडा. ९४०४६९१०२२ हा क्रमांक आपल्या संपर्क यादीत सेव्ह करा. सेव्ह केलेल्या क्रमांकावर 'नमस्कार' / Hello / Hi असा मेसेज पाठवा, मेसेज पाठवताच, हा चॅटबॉट तुम्हाला भाषा निवडण्याचा पर्याय देईल. आता तुम्ही मराठी किंवा इंग्रजी भाषेतून माहिती मिळवू शकता. भाषा निवडल्यानंतर, तुम्हाला विविध प्रकारच्या सेवा आणि सुविधांची यादी दिसेल. उदाहरणार्थ जर तुम्हाला अकोला पोलिसांबद्दल माहिती हवी असेल, तर तुम्ही '१' हा पर्याय निवडा. आपत्कालीन संपर्क क्रमांकांसाठी '२' हा पर्याय निवडा. याचप्रमाणे, इतर विविध सेवांच्या माहितीसाठी संबंधित आकडे निवडून तुम्ही 'अकोला पोलीस व्हॉट्सअॅप चॅटबॉट' चा उपयोग करू शकता ।

अकोला पोलीस व्हॉट्सअॅप चॅटबॉटमधील महत्वाचे वैशिष्ट्ये :–१ जिल्हयातील प्रत्येक पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी संपर्क क्रमांक, ईमेल आयडी, सोशल मिडीया अकाउंट, लोकेशन इत्यादी माहिती उपलब्ध.२ ई–चालान विषयी माहिती.३ पारपत्र (Passport) सेवेविषयी माहिती. चारित्र्य पडताळणी (Character Certificate) विषयी माहिती.५ सायबर जनजागृती (Cyber Awareness) संबंधी माहिती.६ हरवलेले मोबाइल तक्रार नोंदणी प्रक्रिया आणि इतर अनेक उपयुक्त गोष्टीची माहिती या चॅटबॉटच्या माध्यमातुन नागरिकांना मिळणार असुन दिवस रात्र, म्हणजेच २४ तास कार्यरत असेल! त्यामुळे तुम्हाला कधीही आणि कोठेही माहितीची गरज भासल्यास, तो तुमच्या मदतीसाठी तत्पर असेल.

सदर चॅटबॉट श्री. भुषण अरूण रंभापुरे (Cyber Volunteer), सपोनि कान्होपात्रा बन्सा ( प्रभारी अधिकारी सायबर सेल), पो. अंम. स्वप्निल ग. दामोदर सायबर सेल यांनी तयार केले आहे. तसेच याबाबत नागरीकांना काही सुचना किंवा माहिती दयायची असल्यास cybercell.akola@mahapolice.gov.in या मेलवर किंवा सोशल मिडीयावर कळवु शकता.

## उन्हाळ्यातील टंचाई टाळा, रक्तदान करा!

### –सामाजिक संघटनांचे आवाहन
### – रविवार, १३ एप्रिल रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन

■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) : उन्हाळ्यात गरजू रुग्णांना रक्ताची टंचाई जाणवू नये यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन, दि अकोला कन्झुमर प्रॉडक्ट डिस्ट्रीब्युटर असोसिएशन, भारत विकास परिषद, इंडियन रेडक्रॉस सोसायटी, राष्ट्रीय विचार मंच या संस्थांसह विविध सामाजिक संस्थांद्वारा रविवार, १३ एप्रिल रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सिव्हील लाईन पोलिस ठाण्यालगत असलेल्या आयएमए हॉल येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने रक्तदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

दरवर्षी उन्हाळ्यात रक्ताची टंचाई जाणवते. रक्त केंद्रांमध्ये विविध शिबिराच्या माध्यमातून रक्तदात्यांनी केलेल्या रक्तदानाद्वारे रक्तसाठा उपलब्ध असतो. उन्हाळ्यात एकीकडे रक्ताची मागणी वाढत असताना दुसरीकडे रक्तदान शिबिराची संख्या कमी झाल्यामुळे याकाळात रक्त केंद्रात रक्ताचा तुटवडा निर्माण होतो. प्रखर उन आणि शाळा, महाविद्यलयांना असणारी सुटी यामुळे रक्तदान शिबिराची संख्या अधिकच रोडावते. पण गरजू रुग्णांना आवश्यक असर्णाया रक्ताची गरज असतेच. हा विरोधाभास काही अंशी कमी व्हावा, रुग्णांना दिलासा मिळावा, त्यांची रक्तासाठीची वणवण दूर व्हावी या हेतूने दरवर्षी महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. यावर्षीही हे आयोजन रविवार, १३ एप्रिल रोजी करण्यात आले आहे. यासाठी विविध इंडियन मेडिकल असोसिएशन, दि अकोला कन्झुमर प्रॉडक्ट डिस्ट्रीब्युटर असोसिएशन, भारत विकास परिषद, इंडियन रेडक्रॉस सोसायटी, राष्ट्रीय विचार मंच, डॉ. हेडगेवार रक्त केंद्र, संस्कृती संवर्धन समिती, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, अधिवक्ता परिषद, विद्या भारती, संकल्प प्रतिष्ठान, रॉबीनहूड आर्मी, संस्कृत भारती, सक्षम, आदर्श संस्कार मंडळ या सामाजिक संघटनांसह विविध संघटनांनी पुढाकार घेतला आहे. रक्तदान शिबिरात मोठ्या संख्येने रक्तदान करावे, असे आवाहन शिबिर संयोजकांनी केले आहे.

## निधन वार्ता

### दुर्गाबाई शर्मा



**अकोला :** येथील गोपाल सुपर शॉपीजवळील पाण्याच्या टाकीजवळ, अंबिका नगर निवासी दुर्गाबाई हनुमानप्रसाद शर्मा यांचे शुक्रवार, ११ एप्रिल रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्युसमयी त्या ९३ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर सिंधी कॅम्प मोक्षधाम येथे अन्त्यसंस्कार करण्यात आला. त्यांच्या पश्चात तीन मुली, तीन मुले आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे.

## देव हा सामान्य भक्तांचा सोयरा–हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ

### आज महोत्सवाची आदर्श विवाहाने समाप्ती



■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) : मनुष्य तत्त्वाचे तीन प्रकार आहेत. त्यामध्ये जीव, संत व देव या श्रेणी आहेत.या श्रेण्या स्वभावाच्या परीचायक असून हे स्वभावाचे विषय आहेत. जीवाचा स्वभाव सतत घेणे होय. संतांचा स्वभाव कोणाकडे काही न मागता सर्वांना देणे होय तर भगवंताचा स्वभाव प्रथम घेणे व नंतर देणे आहे.स्वभाव हा अपरिवर्तनीय आहे. स्वभावाला औषध नाही. ज्याप्रमाणे कुर्त्याची शेपटी कितीही सरळ केली तर ती सरळ होत नाही, आपला वाकडेपणा सोडत नाही. त्याचप्रमाणे स्वभावाचा विषय आहे.स्वभाव काही केल्या तरी बदलत नाही. अशा या स्वभावाची विशिष्ट शैली असून यामध्ये तिसरी भगवंताची जी श्रेणी आहे ती घेण्यादेण्याची श्रेणी आहे. घेतल्याशिवाय देणे नाही या घेण्यास भगवंताच्या औदार्य व प्रेमाची झालर असल्याचा हितोपदेश हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ यांनी केला.कर्ता हनुमान मंडळाच्या वतीने वानखडे नगर येथील कर्ता हनुमान मंदिर परिसरात गुरुवर्य वासुदेव महाराज व श्रीराम महाराज यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या कीर्तन उत्सवात वारी भैरवगड येथील किर्तनकार हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ यांचे कीर्तन संपन्न झाले.या कीर्तनात त्यांनी संत तुकोबांच्या'अंतरीची घेतो गोडी।पाहे जोडी भावाची।देव सोयरा देव सोयरा।देव सोयरा दिनाचा।'या अभंगावर सुंदर व सारगर्भित कीर्तन सादर केले.ते म्हणाले, भगवंत हे प्रेम, भक्ती, स्मरण आदी बाबी भक्ताकडून घेतात.तर भक्तांना अमर कृपा प्रदान करतात.भगवंत कधी शत्रु मित्र असा भेदभाव करत नाहीत. जी गती यशोदाला भगवंताने दिली, तीच गती पुतनाला पण त्यांनी दिली.भगवंताचे हे औदार्य आहे. त्यांचे सुदारी स्वतंत्र आहे, तर आपले पारतंर्त्यात आहे. आपण नियमाने बांधलेले असून आपल्या औदार्यला पारतंर्त्याची झालर आहे. भगवंताच्या औदार्याची परिसीमा म्हणजे ते वैराग्य व मोक्ष प्रदान करतात.यासंदर्भात

हभप ज्ञानदेव महाराज वाघ यांनी नामदेवाची भगवंताच्या प्रति औदार्यवर शंका हा विषय आपल्या कीर्तनातून सादर केला. नामदेवांनी भगवंताच्या या देण्याघेण्याच्या औदार्यवर शंका केली. तेव्हा भगवंत म्हणतात की विभीषण ला मी लंका दिली,सुग्रीवाला की किष्किंधा दिली, सुदामला सोन्याची द्वारका दिली.या घेण्या–देण्याने भगवंत हे सामान्य भक्तांचे सोयरे झाले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.


RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३ स्थानिक संपादक पुरुषोत्तम खोले फोन ९८८१४८९४७९ (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

## ज्ञान, शक्ती, भक्ती, ऊर्जा व बुध्दिमत्तेचा महासागर

# संकटमोचन महाबली हनुमान

महाबली हनुमान सर्वांचेच संकट मोचन आहेत. हनुमान जन्मोत्सव दरवर्षी चैत्र पौर्णिमेला येत असते. चैत्रशुध्द प्रतिपदेला गुढीपाडवा म्हणजेच हिंदू धर्माचे नवीन वर्ष, यानंतर चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्मोस्तव आणि चैत्र पौर्णिमेला हनुमान जन्मोत्सव साजरा केल्या जाते.भगवान प्रभु रामचंद्र विष्णुचे अवतार आहे तर महाबली हनुमान शंकरजींचा अवतार आहे.

-------------

मुख्यत्वेकरून हनुमानाची पूजा रूईच्या फुलांनी केली जाते. भारतात हनुमान जन्मोत्सवाला पुजाअर्चना करून भव्य शोभायात्रा मोठ्या प्रमाणात काढण्यात येते. महाबली हनुमान हे राम भक्त होते. त्यांच्याजवळ ज्ञान आणि गुनांचा मोठा भंडार होता. त्याचप्रमाणे आपल्यावर जेव्हा-जेव्हा संकटे ओढावतात तेव्हा-तेव्हा आपण हनुमानाला साकडे घालत असतो म्हणूनच हनुमानाला संकटमोचन म्हटल्या जाते.

हनुमानाने रावण दरबारी रामाचे दुत म्हणुन चोख भुमिका बजावली.रावण महाग्यानी व राजनितीज्ञ होता. परंतु अहंकारी असल्याने त्याने संपूर्ण मयार्दांचे उल्लंघन करून हनुमानाच्या शेपटीला आग लावली. परंतु याचा रावणावर विपरीत परिणाम झाला. कारण हनुमान रामाचे दुत म्हणून रावण दरबारी गेले होते.

त्यामुळे हनुमानाने संपूर्ण लंका आगीच्या स्वाधीन करून लंका दहन केले आणि हनुमानाने आपल्या रामभक्तीचे, ज्ञानाचे व शक्ती प्रदर्शन केले. कारण रामाचे संकट म्हणजे स्वतःचे संकट असे हनुमान समजत आणि रामाच्या सुरक्षेसाठी असुरी शक्तीचा संहार करण्यास मदत केली व असुरी शक्तीचे पानीपत केले.महाबली हनुमान रामकथेतील मुख्य सुत्रधार समजल्या जाते. राम, लक्ष्मण, सिता यांच्या सोबत हनुमानाची भुमिका वटवृक्षाच्या सावली सारखी अफाट असल्याचे दिसून येते. तिच प्रतीकृती आज भारतात प्रत्येक मोहल्लात व गावात दिसून येते.

मोहल्या-मोहल्यात व गावा-गावागातील जवळपासच्या पटांगणामध्ये हनुमानजींचे मंदिर दिसुन येते. गावातील कठीण प्रसंग असो किंवा आपल्या स्वतः वरील कठीण प्रसंग असो किंवा आनंदाचा प्रसंग असो किंवा शुभ प्रसंग अशा प्रसंगी सर्वच महाबली हनुमान यांना साकडे घालुन आलेले संकट व येणारे संकट दुर करण्यासाठी आणि सुखःशांती निर्माण व्हावी यासाठी पुजाअर्चना केली जाते व साकडे घातले जाते.

श्रीराम,लक्षण व सीता १४ वर्षे वनवासात असतांना बजरंबली हनुमान व त्यांच्या संपूर्ण वानरसेनेणे सुरक्षा कवच बनुन कार्य केले.कारण बजरंबली हनुमान अहोरात्र रामाचाच जप करायचे म्हणुनच रामाचा जय-जयकार करतांना रामासोबतच हनुमानाचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. याप्रमाणे "सीयाबल रामचंद्र की जय पवनसुत हनुमान की जय" म्हणजेच जीथे राम तीथे आपल्याला बजरंग बली हनुमान दिसून येतो. सीतामाई यांनी ठरवीले की आपल्यासाठी रावणासारख्या बलाढ्य शत्रूशी वानरसेनेने आणि हनुमान यांनी लढा दिला म्हणुन प्रत्येकाला काहीतरी द्यायचे म्हणून भेट वस्तू दिल्या.



यात हनुमानाचा पराक्रम पाहून त्या अती प्रसन्न होत्या. त्यामुळे हनुमानाला आगळीवेगळी मोठी वस्तु भेट देण्याचे ठरवले.

अशावेळी सीतामाईने आपल्या माहेरवरून मिळालेला नवरत्नाचा हार हनुमानाला आदरतिथ्याने भेट दिला. हनुमानाने हाराचा सन्मानाने स्वीकार केला. परंतु काही क्षणात हनुमानाने हारातील मनी दातांनी तोडायला सुरुवात केली.

सीतेच्या तळपायाची आग मस्तकात गेली व हनुमानाला जाब विचारला तेव्हा हनुमान म्हणाले माई ज्या वस्तुत राम- सीता नाही त्याचा मला काय उपयोग? मी रामभक्त आहे असे म्हणत हनुमानाने आपली छाती फाडून आपल्या ह्रदयात राम-सीता आहे हे सीतामाईला दाखवून दिले.

हनुमानाची भक्तीपाहुन प्रभुश्रीराम म्हणाले तुझे माझ्यावर एवढे ऋण आहे की मी तुला काय भेट देणार? यावर हनुमान म्हणाले हे प्रभुरामचंद्र द्यायचेच असेल तर एकच आशिर्वाद द्या, जीथे-जीथे तुमचे भजन-किर्तन सुरू असेल त्याचे श्रवण करण्याची मला संधी द्या.यावर श्रीराम तथास्तु म्हणाले!

तेव्हापासून जिथे-जिथे रामनाम सुरू असते, रामाचा गजर होतो तिथे-तिथे महाबली हनुमानाचे नाव आदराने आपोआप येते. हनुमान जन्मोत्सवाला सर्वांनीच पवनपुत्र महाबली हनुमान यांना साकडे घालुन धरतीवरील कमी होत असलेल्या प्राणवायूची मात्रा पुर्ण करण्यासाठी देशातील संपूर्ण हनुमान भक्तांनी हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे. करोना काळात प्राणवायूचा पुरवठा न मिळाल्याने अनेकांना आपले प्राण गमवावे लागले होते.

यामुळे वृक्ष लागवडीमुळे आपल्याला मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन व प्राणवायू मिळण्यास मोठी मदत होईल याचा फायदा मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीव-जंतु यांना मोठ्या प्रमाणात मिळेल. यामुळे आपल्याला पृथ्वीतलावर हनुमान प्रगट झाल्याचे अवश्य दिसून येईल.

सध्याच्या परिस्थितीत सोशल मीडियाच्या युगात आजचा युवा वर्ग बुध्दीने जरी हुशार आणि तर्बेज असला तरी शारीरिक दृष्ट्या परीपक्व नाही. महाबली हनुमान हे शक्तीचे प्रतीक आहे. त्यामुळे प्रत्येकांनी हनुमानाचे नामस्मरण करून आपल्या आरोग्यासाठी दररोज व्यायाम करणे गरजेचे आहे.

यामुळे उर्जा निर्माण होवून शरीर सुदृढ रहाण्यास मोठी मदत होईल. हे पवणपुत्र हनुमान या कलियुगात भ्रष्टाचार एवढा शिगेला पोहोचला आहे की मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवल्याने भ्रष्टाचार, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या व महागाईच्या रूपात असुरी शक्ती निर्माण झाली आहे. असुरी शक्तीमुळे आज सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.

या कठीण प्रसंगी हे पवनपुत्र हनुमंता वायुरूपात या धर्तीवर प्रगट हो आणि वाममार्गाने चल-अचल संपत्ती कमवणाऱ्यां असुरांना त्यांची जागा दाखवून सर्वसामान्यांना महागाईच्या संकटातून बाहेर काढ.

कारण मुठभर भ्रष्टाचाऱ्यांमुळे सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. अशा संकट प्रसंगी हे संकटमोचन महाबली हनुमान आपण कोणत्याही रूपात पृथ्वीतलावर धावुन यावे अशी आपल्या चरणी प्रार्थना करतो. आज हनुमान जन्मोत्सवाचे औचित्य साधून सर्वांनीच वृक्षारोपणाचा संकल्प करावा यामुळे एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल.

यामुळे गुरांना चारा, पशु-पक्षांना सावली व मानव-जीवजंतुंना शुद्ध हवा मिळण्यास मोठी मदत होईल. असे जर झाले तर प्रत्येक झाडात, पानात, फुलात व फळात आपल्याला महाबली हनुमानजींचे दर्शन अवश्य होईल. कारण महाबली हनुमान नेहमीच निसर्गाच्या सान्निध्यात रहायचे. एक मुखाने बोला जय जय हनुमान!!!

--------------

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

■ ■ ■

# भक्तशिरोमणी हनुमान!



भक्त कसा असावा तर तो महाबली हनुमंतासारखा असावा. हनुमंताची प्रभू श्रीरामांप्रती असलेल्या निस्सीम भक्तीची आजतागायत अनेक उदाहरणे आपण गोष्टींच्या रूपाने वाचली आणि ऐकली आहेत.

प्रचंड सामर्थ्य असतानाही आपल्या आराध्याप्रती कसा भक्तिभाव असावा हे हनुमंताच्या जीवनचरित्रावरून लक्षात येते. सप्त चिरंजीवांपैकी एका असलेल्या भक्तशिरोमणी हनुमंताची जयंती यंदा शनिवारी आल्याने तिला विशेष महत्व असणार आहे. अशा भक्तवत्सल, महाबली हनुमंताची प्रभू श्रीरामांप्रती असलेल्या भक्तीचे एक उदाहरण आज आपण पाहणार आहोत

एकदा हनुमानाची निस्सीम भक्ती पाहून प्रभु श्रीरामाने हनुमानाला वर मागण्यास सांगितले. जो कुणी प्रभु श्रीरामाचे स्मरण करत असेल, त्याचे संरक्षण हनुमंत करील आणि कुणीही त्या व्यक्तीचे अहित करू शकणार नाही, असा वर हनुमानाने मागितला.

प्रभु श्रीरामाने तथास्तु म्हटले. त्रेतायुगात प्रभु श्रीराम अयोध्येचे राज्य करत असतांना काशीनरेश सौभद्रच्या मनात रामभेटीची मनीषा जागृत झाली. त्याच वेळी महर्षि विश्वामित्र यांच्याही मनात प्रभु श्रीरामाला भेटण्याची इच्छा निर्माण झाली. दोघेही अयोध्येच्या दिशेने निघाले. वाटेत एका शिव मंदिरात दोघांची भेट झाली. विश्वामित्रांचे शिष्य शिवाच्या मंदिरात विश्वामित्रांचा जयजयकार करत होते.

शिवाच्या मंदिरात केवळ शिवाचाच जयघोष झाला पाहिजे, अन्य कुणाचाही जयजयकार केला, तर शिवाचा अपमान होतो, असे सौभद्र राजाला वाटले आणि त्याने विश्वामित्रांच्या जयजयकाराला विरोध केला. त्यामुळे महर्षि विश्वामित्र त्याच्यावर कोपले आणि त्यांच्यात वाद झाला. दोघेही जेव्हा अयोध्येत पोचले, तेव्हा त्यांना एकाच वेळी प्रभु श्रीरामाचे दर्शन झाले.

महर्षि विश्वामित्रांनी प्रभु श्रीरामाला काशीनरेशाला कठोर शिक्षा करण्याची आज्ञा केली. प्रभु श्रीरामाने दुसऱ्या दिवशी न्यायसभेत वरील प्रसंगाचा न्यायनिवाडा करणार असल्याचे घोषित केले. प्रभु श्रीराम महर्षि विश्वामित्रांच्या सांगण्यावरून आपल्याला कठोर दंडित करतील, या विचाराने सौभद्र भयग्रस्त झाला.

इतक्यात तेथे नारदमुनी प्रगट झाले आणि त्यांनी सौभद्राला हनुमंताची माता अंजनीदेवीला शरण जाण्यास सांगितले. नारदमुनींच्या सांगण्यावरून सौभद्र सुमेरूला गेला आणि त्याने अंजनीमातेचे चरण धरले. अंजनीमातेने त्याची स्थिती जाणून घेतल्यावर त्याचे रक्षण करण्याचे अभय वचन दिले.

तिने हनुमंताला काशीनरेशाचे रक्षण करण्याचे दायित्व सोपवले. हनुमानाने ते स्वीकारले आणि तो दुसऱ्या दिवशी सौभद्राला सोबत घेऊन पवन वेगाने अयोध्येला येऊन पोचला. त्याने सौभद्रराजाला निर्भय होऊन शरयू नदीच्या किनारी अखंड रामनामाचे स्मरण करत रहाण्यास सांगितले.

सौभद्रराजाने अचानक पलायन केल्याची वार्ता दुसऱ्या दिवशी महर्षि विश्वामित्रांना समजल्यावर ते अधिकच कोपित झाले. त्यांनी श्रीरामाला सौभद्राचा वध करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे प्रभु श्रीरामाने सूर्यास्त होण्यापूर्वी सौभद्राचा वध करण्याचा पण केला.

प्रभु श्रीरामाचे सैनिक सौभद्राला सर्वत्र शोधत होते. त्यांनी तो शरयू नदीच्या किनारी हनुमंतासह रामनामात मग्न असल्याची सूचना महर्षि विश्वामित्र आणि श्रीराम यांना दिली. महर्षि विश्वामित्रांसह प्रभु श्रीराम धनुष्य बाण घेऊन शरयू किनारी आले. त्याने पाहिले की, हनुमान पुढे बसलेला आहे आणि त्याच्या मागे सौभद्र राजा बसलेला आहे.

दोघेही रामनामाचा अखंड जप करत आहेत. प्रभु श्रीरामाने हनुमानाला बाजूला होण्यास सांगितले, तेव्हा हनुमानाने श्रीरामाला त्यांनी पूर्वी दिलेल्या वचनाची आठवण करून दिली. महर्षि विश्वामित्रांनी सौभद्रावर बाण चालवण्याचा आग्रह केला. प्रभु श्रीरामाला कळेना, हनुमानाला दिलेले वरदान खरे करावे कि विश्वामित्रांच्या सांगण्यावरून केलेला पण पूर्ण करावा?

अखेर गुरुस्थानी असणाऱ्या महर्षि विश्वामित्रांच्या आज्ञेवरून प्रभु श्रीरामाने सौभद्रावर बाण सोडला. हनुमानाच्या कृपेमुळे सौभद्राभोवती रामनामाचे संरक्षण निर्माण झाले होते. त्यामुळे प्रभु श्रीरामाचा बाण सौभद्राला लागला नाही. प्रभु श्रीरामाने अनेक बाण सोडले; परंतु एकही बाण सौभद्राला लागला नाही.

रामबाण विफल होत आहेत, हा चमत्कार पाहून महर्षि विश्वामित्र थक्क झाले. त्यांनी अंतर्मुख होऊन विचार केला आणि त्यांच्या लक्षात आले की, भगवंताला स्वतःच्या वचनापेक्षा भक्ताला दिलेले वरदान पूर्ण होणे अधिक महत्त्वाचे वाटते. त्यामुळे त्यांनी श्रीरामाला पण मागे घेण्यास सांगितले. हनुमानाने काशीनरेश सौभद्राला महर्षि विश्वामित्रांचे चरण धरून क्षमा मागण्यास सांगितले. त्याप्रमाणे सौभद्रने महर्षि विश्वामित्रांची क्षमा मागितली आणि महर्षि विश्वामित्रांनी त्याला क्षमा केले.

अशा प्रकारे हनुमानाने प्रभु श्रीरामाला धर्मसंकटातून सोडवले आणि सौभद्र राजाचे रक्षणही केले. वरदान आणि पण यांच्या युद्धात वरदानाचा विजय झाला. जर एखादा रामनामाचा जप करत असेल आणि प्रभु श्रीरामाने त्यावर बाण चालवला, तरी त्याचे काहीही अहित होत नाही, हे या प्रसंगातून दिसून येते. भक्तशिरोमणी हनुमानाने रामसे बडा रामका नाम ही म्हण सार्थ ठरवली.

----------------

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

■ ■ ■

## बाबासाहेबांच्या लढ्याप्रती एकनिष्ठ राहण्याची गरज



**दादासाहेब पी. बी.खडसे**
**मुख्य संपादक**
**लोकतंत्र नायक**

जातिवाद, मनुवाद, भेदाभेद, विषमता, अन्याय, अत्याचार, शोषण, अंधश्रद्धा या अमानवीय प्रवृत्या विरोधात भारतरत्न, महामानव, विश्वभूषण, बोधिसत्व, मुक्तिदाता, भारतीय संविधानाचे शिल्पकार, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रणशिंग फुंकले आणि लढा दिला. समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुत्व ही विचारतत्वे, विचारधारा भारतीय संविधानाच्या माध्यमातून देशाला अर्पण केलीत.

आज संपूर्ण भारत देशाची व्यवस्था, राज्य कारभार भारतीय संविधानानुसार चालत आहे, भारतीय संविधानानुसार भारतातील प्रत्येक नागरिकाला समता,स्वातंत्र्य, न्याय व बंधुत्व या विचार तत्वांची फळे चाखता यावीत यासाठी देश पुढे मार्गक्रमन करीत आहे. भारतीय संविधानामुळेच समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुत्व या हक्क विचारधारेची हमी प्रत्येक भारतीयाला भारतीय संविधानाचे शिल्पकार परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळेच मिळाली आहे. असे असतानाही मनुवादी विचारसरणीचे विषमतावादी, जातीवादी लोक डोके वर काढू पहात आहेत.

दलित, शोषित, पिढीता वरील जातीय भेदभावातून अन्याय अत्याचार आजही वाढतच आहे. अनुसूचित जाती, जमाती, आदिवासी आणि स्त्रिया यांचे न्याय, हक्क व अधिकार हिरावल्या जात आहेत. दलित, शोषितांना भारतीय संविधानानुसार न्याय मिळणे कठीण व दुर्लभ असेच होऊन बसले आहेत. बेरोजगारी व गरिबी वाढत आहे. श्रीमंत हा अधिक श्रीमंत बनत आहे पुंजीवादाने डोके वर काढलेले आहे.

मुक्तिदाता, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका,संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मंत्र तुम्हा आम्हाला दिला. समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुत्व प्राप्त करण्यासाठी मुक्तिदाता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराच्या सामाजिक राजकीय व धार्मिक स्तरावरील सर्वच लढ्याला मनुवाद्यांनी खिंडारे पाडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेला हा "भीम लढा" मनुवाद्यानी साम-दाम -नीती -दंड -भेद वापरून कमकुवत, कमजोर केलेला दिसतो.

मुक्तीदाता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिवार्णानंतर या भिम लढ्याला मनुवाद्यांच्या दावणीला बांधण्याचे काम तथाकथित बेईमान पुढाऱ्यांनी केल्याचे दिसते. मुक्तिदाता, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व लढ्या प्रति आंबेडकरी अनुयायांनी एकवटून, एकसंघ होऊन समता, स्वातंत्र्य व बंधुत्व व न्यायासाठी प्रामाणिक व एकनिष्ठ होऊन लढण्याची खऱ्या अर्थाने आज गरज आहे.

परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या भारतीय संविधानाच्या रक्षणाची आज गरज आहे. भगवान बुद्धाची धम्मतत्वे रोजच्या जीवनात प्रामाणिकपणे अंगीकारण्याची गरज आहे.

बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी महाविहार हे अद्यापही कथित मनुवादी लोकांच्या ताब्यात आहे, महाबोधी बुद्ध विहार मनुवाद्यांच्या ताब्यातून मुक्त करणे गरजेचेआहे. भगवान बुद्ध यांच्या मूर्ती असलेले अनेक मंदिरांवर मनुवादी लोकांचा ताबा आहे, हे पुरातन बुद्ध विहारे मनुवादी पुरोहितांच्या ताब्यातून मुक्त होणे गरजेचे आहे.

अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कमजोर करण्यात आला आहे, दलित, शोषित, पिढीतांच्या न्याय व रक्षणासाठी अॅट्रॉसिटी अॅक्ट या कायद्याला अधिक शक्तीशाली व मजबूत करने काळाची गरज आहे. अनुसूचित जाती, जमाती,बौद्ध व आदिवासी यांच्या विकास व कल्याणाकरिता शालेय व महाविद्यालयीन शिक्षण सरसकट मोफत करण्याची गरज आहे.

अनेक सरकारी व्यवस्थापन संस्थांचे खाजगीकरण करण्याचा घात आखल्या जात आहे, ते थांबवणे गरजेचे आहे. गरिबी आणि बेरोजगारी वाढत आहे, दारिद्रय निर्मूलन होऊन रोजगार उपलब्ध करणे गरजेचे आहे.

स्त्रियांवरील होणा?या अन्याय अत्याचाराला वेळीच रोक थांब करण्याची नितांत गरज आहे. तसेच वाढत्या अंधश्रद्धेचे निर्मूलन करने गरजचे आहे. देशात व राज्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार वाढत चाललेला आहे, या वाढत्या भ्रष्टाचाराला समूळ नष्ट करने देशाच्या प्रगती व विकासासाठी आवश्यक आहे.

यापुढील आंबेडकरी आंदोलनाचा लढा या समग्र दिशेने सामाजिक व राजकीय पटलावर मार्गक्रमण होणे तसेच करणे उपाय योजना आखने आवश्यक आहे आणि हा आंबेडकरवादी लढा लढण्याची जबाबदारी तुम्हा आम्हा वर येऊन ठेपलेली आहे, हा आंबेडकरवादी लढा आपण लढलाच पाहिजे ती तुमची माझी व आपण सर्वांची प्रामाणिक जबाबदारी आहे.

सोबतच आंबेडकरवादी आंदोलनाला बेईमान व गद्दार झालेल्या नाटकी, बेईमान व्यक्तींच्या नांग्या आता ठेचून काढण्याची जबाबदारी आंबेडकरवादी नवयुवकांवर येऊन ठेपलेली आहे. आंबेडकरवादी असल्याचा खोटा बुरखा घालणाऱ्या नाटकी पुढारी, व त्यांच्या कार्यकर्त्यांना आंबेडकरवादी चळवळीतून हद्दपार करण्याची गरज आहे.

नाटकी, संधीसाधू, बेईनानांना ओळखून आंबेडकरवादी आंदोलनाची धार, गती,अधिक तीव्र व तीष्ण केली तरच शोषित पिढीतांचे न्याय व हक्क तुम्हा - आम्हाला साबुत ठेवता येईल, हे सूर्यप्रकाशाइतके अमिट सत्य आहे.

अन्याय, अत्याचार, शोषण, अंधश्रद्धा, भ्रष्टाचार जातीयवाद, आणि मनूवादा विरुद्ध मुक्तिदाता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रत्येक अनुयायी, " सच्चा पँथर," एकसंघ,एकसंघटित होऊन शोषित, पीडित, वंचितांच्या समता, न्याय व हक्कासाठी लढला पाहिजे आणि ती खरी गरज आहे.

विश्वभूषण, विश्वरत्न, महामानव,बोधिसत्व, भारतरत्न, मुक्तिदाता, भारतीय संविधानाचे शिल्पकार परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या येणाऱ्या 134 व्या जयंती दिनानिमित्त तमाम भारतीय जनतेस मंगलमय हार्दिक शुभेच्छा. जय भीम..!!! जय संघर्ष...!!!

●●●●●

## क्रांतिसूर्य महात्मा फुले



शिक्षक, लेखक, समाजसुधारक आणि स्त्री शिक्षणाचा पाया घालणारे महात्मा जोतिबा फुले यांची जयंती ११ एप्रिल रोजी साजरी केली जाते. या निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

महात्मा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी सातारा जिल्ह्यातील कटगुण या गावी झाला. त्यांचे मूळ नाव 'ज्योतिराव गोविंदराव फुले' असे होते. त्यांच्या वडिलांचा फुलांचा व्यवसाय असल्यामुळे त्यांना 'फुले' हे आडनाव मिळाले.

जेव्हा जोतिबा फक्त ९ महिन्याचे होते, तेव्हा त्यांच्या आईचा मृत्यू झाला. त्यामुळे त्यांची काळजी घेण्याची जबाबदारी त्यांच्या वडिलांवर आली. लहानपणीच आई गेल्यामुळे जोतिबांचा स्वभाव गंभीर आणि समंजस बनला. आईचा आधार नसतानाही त्यांनी शिकण्याची इच्छा मनात ठेवली. जोतिबा जेव्हा शाळेत जात होते, तेव्हा त्यांच्या घरातील लोक आणि समाज शिक्षणाला विरोध करत होते. तरीही त्यांनी स्कॉटिश मिशन शाळेत प्रवेश घेतला. एकदा ते शाळेत जात असताना काही लोकांनी त्यांची थट्टा केली, पण जोतिबा डगमगले नाहीत. उलट त्यांनी ठरवले की, "माझ्यासारख्या सगळ्यांना शिकायला मिळाले पाहिजे!"

महात्मा फुले यांनी सावित्रीबाई फुलेंना शिकवले आणि त्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका बनवले. त्यांनी १८ शाळा काढल्या. त्यांनी १८७३ मध्ये 'सत्यशोधक समाज' स्थापन केला. त्यांनी गुलामगिरी, शेतकऱ्याचा असूड यासारखी पुस्तकंही लिहिली. महात्मा फुले यांचा मृत्यू २८ नोव्हेंबर १८९० रोजी झाला. पण त्यांच्या कार्यामुळे आजही आपण शिक्षणाचा प्रकाश पाहतो.

-------------

**क्षितिज कोल्हे**
**जि. प. प्राथमिक शाळा सुकळी, केंद्र कोठा.**
**ता. कळंब. जि. यवतमाळ.**

■ ■

### वाचक लिहितात

### हनुमंताच्या कायार्तून मुलांचा व्यक्तिमत्व विकास!

हजारो वर्षांपासून आपण रामभक्त हनुमानाची भक्ती करत आलो आहोत. हनुमंताची दास्यभक्ती हे परमोच्च आदशार्चे प्रतीक आहे. प्रभू रामासारख्याच उच्च स्थानावर हनुमंताचे स्थान आपल्या ह्रदयात आहे.

हनुमंताचा जन्म चैत्र शुद्ध पौर्णिमेला झाला. जन्मताच त्यांनी आपल्या अद्भुत शक्तीचे प्रदर्शन केले आणि सूयार्ला फळ समजून गिळण्यासाठी झेप घेतली. सप्तचिरंजीवांपैकी एक असलेले वीर हनुमान हे केवळ त्यांच्या शौर्यासाठीच प्रसिद्ध नाहीत, तर ते सकल शास्त्रांचे अभ्यासक होते. तत्त्वज्ञान, राजनीति, संगीत, भाषाशास्त्र, बुद्धीचे वरदान आणि वक्तृत्वकला झ या सर्व गुणांमध्ये ते पारंगत होते.

आजकाल आपण मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी वेगवेगळ्या वर्गांना प्रवेश देतो. मात्र, जर पालकांनी मुलांना हनुमानाचे चरित्र वाचायला दिले, तर त्यांच्या कायार्तून व विचारांमधून मुलांचा व्यक्तिमत्व विकास नक्कीच घडू शकतो. उदाहरणच द्यायचे राहिले तर रामायणातील एक प्रेरणादायी प्रसंग सांगू शकतो. भगवान श्रीराम सीतेचा शोध घेत असताना ऋष्यमूक पर्वताजवळ आले. त्या वेळी पर्वतावर असलेल्या सुग्रीवाने त्यांना पाहिले आणि त्याला वाटले की वालीनेच त्यांना आपल्याला मारण्यासाठी पाठवले आहे. म्हणूनच तो त्यांची पारख करण्यासाठी हनुमंताला पाठवतो.

हनुमंत ब्राह्मणाचा वेष धारण करून श्रीराम आणि लक्ष्मण यांच्याकडे जातो. वेदशास्त्रसंपन्न असलेला हनुमंत आपल्या संभाषण चातुर्याने राम लक्ष्मणाचा परिचय जाणून घेतो. अतिशय आदराने त्यांचे मनोगत जाणून घेतो . आणि संपूर्ण खात्री झाल्यावरच आपले खरे रूप प्रकट करतो. आणि रामाच्या चरणी नतमस्तक होतो. श्रीरामानी मात्र त्याला केव्हाच ओळखले असते. दूत म्हणून संवाद कसा साधावा याचा आदर्श हनुमंत दाखवतो. हनुमंताची राम भक्ती, समर्पण, चातुर्य, बुद्धिमत्ता, कौशल्य हे सगळं आत्मसात करायचे असेल तर हनुमानाला शरण जाऊया. उत्साहात आणि भक्ती भावात हनुमान जयंती साजरी करूया.

■ **सौ. रमा देशमुख,**
**नागपूर.**

### हनुमंताची दास्यभक्ती!

दास्यभक्तीचा उत्तुंग आदर्श म्हणजे हनुमंताची दास्यभक्ती! साक्षात भगवंताचे दास्य लाभलेल्या हनुमंताला कोणत्याही प्रकारच्या वैभवाची इच्छा नव्हती. इतकेच नव्हे, तर मोक्षप्राप्तीची सुद्धा इच्छा नव्हती. प्रभू श्रीरामांचे दास्य "रामदास्य" हेच त्यांचे वैभव होते.

हनुमंताचे जीवन स्वतःसाठी नव्हतेच. श्रीराम सेवा हेच त्यांचे जीवन होते. अतिप्रचंड शक्तिसंपन्न असूनही नम्रता हा त्यांचा स्थायीभाव होता. साक्षात प्रभू श्रीराम त्यांना मोक्ष देण्यास सिद्ध असतानाही युगानुयुगांच्या अंतापर्यंत श्रीरामांचा दास होऊन राहणेच हनुमंताने स्वीकारले होते. अशी हनुमंताची दास्यभक्ती अवर्णनीय आहे. त्यांचे संपूर्ण जीवन नम्रता आणि सेवाभावाचे उदाहरण आहे. शक्तीसोबतच भक्ती, बुद्धी आणि सेवाभावाचे प्रतीक म्हणजे श्री हनुमान! हे हनुमंता, तुज्या भक्तीच्या बळावर आमच्यात संकटांवर मात करण्याची ताकद निर्माण होऊ दे आणि तुज्यासारखी दास्यभक्तीची तळमळ आमच्यात निर्माण होण्यासाठी तूच आम्हाला सद्बुद्धी दे, अशी तुझ्या चरणी प्रार्थना आहे.

■ **सौ. प्रिया बागडदेव**
**छिंदवाडा.**

## बदलत्या ऋतूमध्ये डोळ्याची काळजी कशी घ्यावी?



उन्हाळ्यात तुमच्या त्वचेची आणि आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे असते. बदलत्या हवामानासोबत डोळ्यांतून आपोआप अश्रू येतात ही अनेक लोकांसाठी एक सामान्य समस्या आहे. असे कोणत्याही ऋतूत होऊ शकते.

आरोग्य खराब होण्याचे अनेक कारणे असू शकतात. तज्ञांच्या मते बदलत्या ऋतूमध्ये तुमच्या शरीरातील रोगप्रतिकारकशक्ती वाढवणे गरजेचे असते.

ऋतू बदलताना, हवेत परागकण, धूळ किंवा बुरशीच्या कणांचे प्रमाण वाढते, ज्यामुळे डोळ्यांत जळजळ, खाज सुटणे आणि पाणी येणे असे प्रकार होतात. याशिवाय, या अॅलर्जीला ताप किंवा हंगामी अॅलर्जीक नेत्रश्लेष्मलाशोथ असे म्हणतात. थंड किंवा खूप कोरडी हवा डोळे कोरडे करू शकते. ज्यामुळे डोळ्यांना ओलावा देण्यासाठी शरीर जास्त प्रमाणात अश्रू निर्माण करते, ज्यामुळे असे दिसते की डोळ्यांतून आपोआप अश्रू येत आहेत.

जेव्हा आपण गरम ठिकाणाहून थंड ठिकाणी जातो (जसे की एअर कंडिशनरमधून बाहेर पडणे), तेव्हा डोळ्यांच्या पृष्ठभागावर परिणाम होतो आणि रिफ्लेक्स फाडणे होऊ शकते. बदलत्या ऋतूंमध्ये, बॅक्टेरिया किंवा विषाणूमुळे डोळ्यांमध्ये सौम्य संसर्ग होऊ शकतो, ज्यामुळे अश्रू येतात आणि जळजळ होते. नाक आणि डोळ्यांमध्ये (नासोलॅक्रिमल डक्ट) एक संबंध आहे आणि सर्दी दरम्यान ते ब्लॉक होऊ शकते किंवा प्रभावित होऊ शकते, ज्यामुळे डोळ्यांतून पाणी येऊ शकते.

उन्हाळ्यात व्हिटॅमिन ए युक्त आहार म्हणजे हिरव्या पालेभाज्या, अंड्यातील पिवळा गर, पपई, संत्रे इ. चे नियमित सेवन करावे. जर लहानग्यांच्या डोळ्यात नेहमी पाणी येत असेल किंवा तिरळेपणा जाणवत असेल तर नेत्रविकाररोगतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

बाळाने ए-बी-सी-डी वाचण्यास सुरू केले की, डोळ्यांची नियमित तपासणी करावी. घराबाहेर पडताना डोळ्यांवर सनग्लासेस अत्यावश्यक आहे. कॉन्टॅक्ट लेन्स वापरत असाल तर हा वापर क्रमप्राप्तच आहे. अतिनिल किरणांपासून (अल्ट्राव्हॉयलेट रेंज) 99 ते 100 टक्के संरक्षण करणाऱ्या सनग्लासेस वापरण्यास प्राधान्य द्यावे. अन्यथा मोतीबिंदू अथवा मॅक्युलर डिजनरेशन सारखे डोळ्यांचे विकार उद्भवण्याची शक्यता वाढते. शिवाय सनग्लासेसमुळे धुळ आणि छोट्या किटकांपासून रक्षण होईल.

डोळ्यांनी धुसर दिसत असेल, काम करताना डोळ्यांवर ताण पडत असेल, फोकस करण्यास त्रास होत असेल, डोळे कोरडे होत असतील, डोळे लाल असतील तर डोळे तपासावे. कदाचित चष्मा लागू शकतो, नंबर बदलू शकतो किंवा कुठले अन्य विकार आहेत हे कळू शकते. त्यामुळे लवकरात लवकर उपचारास सुरुवात होऊन पुढील गुंतागुंत टाळता येते.

आहारही समतोल असावा. वजनावर नियंत्रण असले तर डोळ्यावर कमी दबाव येतो; म्हणून वजन नियंत्रणात असावे. धुम्रपान टाळावे, नियमित व्यायाम करावा, आणि मोठ्यांनी वषार्तून एकदा तर लहान्यांनी सहा ते आठ महिन्यातून एकदा डोळ्यांची तपासणी करावी. डोळे फार अमुल्य आहेत. डोळ्यांच्या आजारासोबत कुठलीही तडजोड करू नये. डोळ्यांची नियमित काळजी घ्या आणि दृष्टीचे रक्षण करा.

■ ■ ■

### अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## महावीर हनुमान

बल त्याग स्वामी निष्ठेचे
प्रतिक रामभक्त हनुमान
गुध त्याचे अंगीकारता
आमचे जीवन बनते महान

सूर्यवंशी आमचे जवान
करेना बलाची उपासना
सांगा होतील साकार यांच्या
स्वप्नातील मनोकामना

इंटरनेटच्या व्यसनाने
करती वेळेची बरबादी
अशाने कशी होईल
तरूणाईची कार्यसिद्धी?

महासागर ●शनिवार,दि.१२ एप्रिल २०२५

अकोला पान ६

# मनपा प्रशासनाद्वारे मोर्णा नदीतील जलकुंभी काढण्याचे कार्य युध्द पातळीवर सुरू

## आजपर्यंत जवळपास १.७ कि.मी.जलकुंभी काढण्याचे काम पुर्ण

**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :** मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा उपायुक्त गीता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात आणि जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा यांच्या देखरेखीत अकोला शहराच्या मध्य भागातून वाहणारी मोर्णा नदीतील जलकुंभी काढण्याचे कार्य मनपा प्रशासनाद्वारे युध्द पातळीवर सुरू असून आज पर्यत अकोली खुर्द ते हरिहर पेठ येथील ईदगाह जवळ पर्यत १.७ कि.मी. च्या जवळपास जलकुंभी काढण्याचे कार्य पुर्ण झालेले आहेत. अकोला शहरातील मोर्णा नदीच्या पात्रात उन्हाळ्याचे दिवसांमध्ये जलकुंभी वाढण्याचे प्रमाण वाढत असल्यामुळे नदीपात्र जवळच्या भागामध्ये डासांचा प्रादुर्भावात वाढ होत असल्याने मनपा आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशान्वये मागील वर्षाप्रमाणे मनपाच्या स्वबळावर नदीतील जलकुंभी काढण्याच्या कामाला २७ मार्च पासून मनपाची पोकलेन




मशीन आणि मजूर लावून काढण्यास सुरुवात करण्यात आली आहे. जलकुंभी काढण्याचे तसेच नाले सफाईचे काम हे जलदगतीने व्हावे याकरिता मनपा आयुक्त डॉ.लहाने यांच्या आदेशान्वये मनपाच्या पोकलेन मशीनसाठी जलकुंभी काढण्यासाठी येणारी विशेष बकेट खरेदी करून लावण्यात आली आहे. यामुळे जलकुंभी काढण्याचे काम हे चार ते पाच पटाने वाढलेले असून सदरचे काम अत्यंत कमी खर्चात होत असून आगामी काही दिवसातच मोर्णा नदीतील संपुर्ण जलकुंभी काढण्याचे काम हे पुर्णत्वास येणार आहे.

# गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या प्रचार रथाचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते शुभारंभ

**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :** नाला खोलीकरण व रुंदीकरण. मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने महाराष्ट्र सरकारची गाळ मुक्त धरण व गाळ युक्त शिवार ही योजना लोकचळवळ करण्यासाठी आणि जनजागृती करण्यासाठी भारतीय जैन संघटनेच्या वतीने आणि सुहाना मसाले यांचे सहकार्याने अकोला जिल्ह्यात एक प्रचार रथ फिरविण्यात येणार आहे.

या प्रचार रथाचा शुभारंभ जिल्हाधिकारी अजित कुंभार यांचे हस्ते आज दिनांक ११ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. यावेळी जिल्हा जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल मस्कर, भारतीय जैन संघटनेचे या प्रकल्पाचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष गादिया, समीप इंदाने, नरेश चौधरी, बीजेएसच्या महिला जिल्हाध्यक्ष ममता जैन, बीजेएसचे महानगर अध्यक्ष विमल जैन, माजी नगरसेविका उषा विरक, रवी जैन, रमेश तोरावत, राजेश सोनी, संजय महाजन, सचिन पारेख, मंजू जैन , चैताली साखरे,




माधुरी बोडखे,गीता बाली उनवणे,तुषार हांडे, जलसंधारण विभागाचे चंद्रशेखर खंडेराव, संजय कुंभरे, शुभम गाडगे बीजेएसचे जिल्हा सम न्वयक विष्णू गव्हाळे प्रामुख्याने उपस्थित होते.महाराष्ट्र राज्य दुष्काळमुक्त करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रिम प्रोजेक्ट असलेली गाळ मुक्त धरण आणि गाळ युक्त शिवार ही योजना राबविण्यात येत आहे. ही योजना तळागाळापर्यत नेण्यासाठी भारतीय जैन संघटना आणि महाराष्ट्र सरकारम ध्ये एक सामंजस्य करार करण्यात आला आहे. या सामंजस्य करारानुसार शासनाची ही योजना प्रत्येक गावापर्यत नेवून धरण आणि बंधाऱ्यातील गाळ काढणे, नाल्यांचे खोलीकरण आणि रूंदीकरण करण्यासाठी मागणी निर्माण करण्याचे कार्य भारतीय जैन संघटना करीत आहे. याच योजनेचा एक भाग म्हणून प्रचार रथाचा आज शुभारंभ करण्यात आला आहे.

# गावागावात मराठा सेवक या उपक्रमात सहभागी होण्याचे मराठा समाज बांधवांना जाहीर आवाहन

**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :** अकोला जिल्ह्यातील सकल गरजवंत मराठा समाजाच्या वतीने मराठा, पाटील, कुणबी, देशमुख असामी, घाटोळे पाटील आदी सर्व पोट जातीच्या समाजबांधवांना संघटित करण्यासाठी गावागावात मराठा सेवक नेमण्याचा निर्णय दिनांक पाच एप्रिल ला अंतरवरी सराटी येथे मराठा योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे.

या उपक्रमाचा उद्देश समाजातील विविध प्रश्न व अडचणी सोडवणे, तरुणांना सामाजिक कार्यात सहभागी करून घेणे, आणि एकत्रित प्रयत्नांद्वारे समाजाची उन्नती साधणे, समाजातील गोरगरीब सर्वसामान्य लोकांचे प्रश्न सोडवणे हा आहे.हा निर्णय नुकत्याच झालेल्या विशेष बैठकीत माननीय मनोज जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

त्यांच्या सूचनेनुसार प्रत्येक गावात एक सक्रिय, समाजाभिमानी, आणि जबाबदार मराठा सेवक नेमला जाणार आहे, जो त्या गावातील समाजाच्या प्रश्नांवर लक्ष ठेवेल व तालुका व जिल्हा पातळीवर ते मांडेल.या उपक्रमात सहभागी होण्यासाठी अकोला जिल्ह्यातील तरुणांनी पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले आहे. इच्छुक युवकांनी अकोल्यातील मराठा योद्धे राजेश देशमुख, मोबाईल नंबर९८२२३९९७२३, गजानन हरणे, संवाद ९८२२९४२६२३किंवा संबंधित तालुक्यातील सकल गरजवंत मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

समाजहिताच्या या अभियानात अधिकाधिक तरुणांनी सहभागी व्हावे, समाज संघटन मजबूत करावे व मराठा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घ्यावा, ही नम्र विनंती सकल गरजवंत मराठा समाज, अकोला जिल्हा यांच्यावतीने करण्यात आली आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात महात्मा जोतिबा फुले यांची जयंती साजरी



**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :** महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील लोकशाही सभागृहात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील,अधीक्षक शाम धनमाने यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागाच्या कर्मचाऱ्यांनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## दहशतवाद विरोधी शाखा,अकोला कडुन बॉम्ब ठेवुन स्फोट घडवुन आणण्यासंबंधी माहिती

# सिध्दार्थ बौध्द विहार तारफाईल, रामदासपेठ, अकोला येथे 'मॉक ड्रिल'

**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :** अकोला शहरातील तसेच जिल्हयांतील नागरीकांनी जिल्हयात कोणत्याही ठिकाणी बॉम्ब स्फोटाचे अनुषंगाने सतर्क रहावे तसेच बॉम्ब बाबत सर्च ऑपरेशन कसे राबवावे. नागरीकांना सदर ठिकाणावरून सुरक्षित कसे बाहेर काढायचे, यात नागरीकांना सुरक्षितता कशी प्रदान करायची त्याच प्रमाणे दहशतवादी कृत्य व बॉम्ब स्फ्फोटाचे घटनांबाबत जनम णसात जनजागृती निर्माण व्हावी या करीता मा.श्री.बच्चन सिंह पालास अधीक्षक, अकोला, मा.श्री. अभय डोंगरे, अप्पर पोलीस अधीक्षक, अकोला तसेच मा.श्री.सतीश कुलकणी उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली तसेच त्यांचे प्रत्यक्ष उपस्थितीत दहशतवाद विरोधी शाखा, अकोला चे प्रभारी अधिकारी पो.उप.नि. संतोष तिवारी, त्यांचे शाखेतील पोलीस अंमलदार, स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि. शंकर शेळके व त्यांचे पो. अंमलदार, पो. नि. श्री. राऊत, दहशतवाद विरोधी पथक, अकोला व त्यांचे पोलीस अंमलदार, बॉम्ब शोधक व नाशक पथक, अकोला, आय. कार. युनिट, अकोला, पोलीस मुख्यालय, अकोला येथील ठउझ व टठढ ची पथके आणि स्थानिक अकोला शहरातील पोलीस





स्टेशनचे प्रभारी अधिकारी व त्यांचे पोलीस अंमलदार यांचे सम न्वयाने दि. ११.०४.२०२५ रोजी दुपारी १७.३८ वा. पासुन १८.४० वा. पावेतो पो.स्टे. रामदासपेठ, अकोला चे हददीतील सिध्दार्थ बौध्द विहार तारफाईल येथे अज्ञात इसमाने बौध्द विहारामध्ये बॉम्ब ठेवले असुन तो त्या बॉम्बचा सिरीयल ब्लास्ट करणार आहे असा कॉल नियंत्रण, अकोला येथे प्राप्त झाला आहे ' असा बनाव करुन मॉक ड्रिल ( रंगीत तालीम) चे आयोजन करण्यात आले. सदर रंगीत तालीमी मध्ये बौध्द विहार व सदर परिसरातील लोकांना तेथून सुखरुप बाहर काढण्याचा तसेच BDDS पथकाकडील उपकरणे आणि श्वानाचे मदतीने संपुर्ण बौद्ध विहाराची तपासणी करण्याचा सराव प्रभाविरित्या पार पाडण्यात आला.सदर मॉक ड्रिल ( रंगीत तालीम ) मध्ये अकोला शहरातील एकुण १२ पोलीस अधिकारी तसेच ८८ पोलीस अंमलदारांनी सहभाग घेवुन रंगीत तालीमी दरम्याने त्यांना दिलेले कर्तव्य त्यांनी उत्कृष्टपणे पार पाडले. सदर मॉक ड्रिल (रंगीत तालीम) प्रभावीरित्या व यशस्वीरित्या पार पाडण्याकरीता मा. श्री. वच्चन सिंह, पोलीस अधीक्षक, अकोला, मा. श्री. अभय डोंगरे, अप्पर पोलीस अधीक्षक, अकोला तसेच मा. श्री. सतीश कुलकणी, उपस्थित होते.

# चैत्र महिन्यातली बारसला निघाल्या नवसाला पावणारी महादेवाची काठी

**हिवरखेड,दि ११ (प्रतिनिधी) :** हिवरखेड येथे आदीकाला पासुन म्हनजे ऐतिहासीक वारसा लाभलेल्या मरिमायची ,भवानीम ाय जानामाय आसरा मायचे भगत होतात नवस म्हनून हे भगत लोक जानामाय मरीमाय भवानी मायचे नावाने पाच घरी जोगवा मागतात पाच दिवस चालनारा नवसाचे दुसरे दिवशी बारसला श्री शकरं सस्थान देवळी वेस व मानाचा मोठा महादेवाची काठी या महिन्यात म्हनजे चैत्राच्या महीन्यात नवसाला पावनारी माय म्हनजे



सदानंदी का ऊदोच्या गजरात डफळ्याचे तालावर एकादशीला नवस फेडनारे भगत महादेवाच्या देवकाठीची मिरवनूक काढत असतात आजही भक्तानी नाचत पायात घूंगर बांधून खांद्यावर काठी घेर्नाया भगता समोर राळ टाकलेले धूपारन्याच्या धूरात आपल्याच तालात त्या काठीचे सरक्षन करत भगत मस्त नाचत चंडिका चौक बारगण पुरा भवानी मंदीर हनूमान मंदीर देवळीवेस शंकर सस्थांन,ची काठी व मोठा महादेव सस्थांन ची मोठा महादेव सस्थांनवर वाजत गाजत शांततेत पोहचल्या यावेळी बिट अमलदार महादेव नेवारे सह गृहरक्षक दल हजर होते.

## सर्पमित्रानी पकडला विषारी नाग

**बार्शिटाकळी, दि ११ (प्रतिनिधी) :** येथे काल दुपारी लोकसंचालीत साधन केंद्र कार्यालयात कोब्रा जातीचा विषारी नाग आढळून आला. कर्मचारी आपापल्या कामात असताना विषारी साप पाठीमागच्या दरवाजामधून कॅम्पुटर रूम मध्ये जाताना दिसला.

सर्पमित्र विकी उमाळे यांना बोलवण्यात आले. उमाळे ऑफिसमध्ये पोहोचले आणि सापाला शोधून काढले. सापाला पकडून ऑफिस मधील कर्मचारी व महिलांच्या मनातली भीती काढली सापा विषयी माहिति दिली व त्याल जीवनदान दिले.

# दुर्गवाडा फिटर अंतर्गत येत असलेल्या लाखपुरी सह इतर गांवानमध्ये लाईन चालु बंद मुळे नागरिक अंधारात

## महावितरण विभागाचे दुर्लक्ष....

**लाखपुरी,दि ११ (प्रतिनिधी) :** मुर्तिजापुर तालुक्यातील लाखपुरी सर्कल मधील दुर्गवाडा फिटर अंतर्गत येणार–या लाखपुरी सह इतर गावानमध्ये नेहमी लाईट दिवसा व रात्री चालु बंद राहत असल्यामुळे नागरिकांना नाहाक त्रास सहन करावा लागत आहे . अंधारात राहाण्याची वेळ आली आहे.लाखपुरी व इतर गावातील विद्युत उपकरण शॉट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. रात्री बेरात्री लाईट बंद राहत आहे. त्यामुळे घरात असलेला महागड्या वस्तू फ्रिज, टिव्ही, कॉम्प्युटर, पंखा सह इ . वस्तूची नुकसान होवु शकते.सदर समस्ये कडे महावितरण विभागाने याकडे लक्ष देण्याची गरज असुन संबधित दुर्गवाडा फिटर अंतर्गत जे काही गावे येत आहे. त्या गावातील लाईन नेहमी बंद राहत आहे. याकडे कोणीही लक्ष देण्यास तयार नाही असे नागरिकांचे म्हणणे आहे. सदर दुर्गवाडा फिटर अंतर्गत



येणा–या सर्व गावातील लाईनच्या समस्यानचे प्रश्न सोडवाव्यात हि मागणी परिसरातील नागरिकांन कडुन होत आहे.

# उर्स संदल यात्रेनिमित्त संध्याकाळी फिर्यादी व त्यांचे मित्र पाळण्यामध्ये बसण्याचे व जुन्या पैशाच्या कारणावरुन ३ आरोपींनी चाकूने मारुन केले गंभीर जखमी

**पातुर,दि ११ (प्रतिनिधी) :** पातूर पोलीस स्टेशन अंतर्गत शहरातील शहाबाबू मैदान येथे ८/०४/२५ चे. रात्री १० वाजता दरम्यान फिर्यादी उबेद अहमद शेख मुनीर वय २३ वर्ष व्यवसाय ड्रायव्हर बाळापुर ,बडा मोमीनपुरा यांची तक्रारीवरून आरोपी यश्र तिन्ही बाळापुर बडा मोमीनपुरा असे तिघेही पाळणया( झुल्या) जवळ आले व त्यांनी फिर्यादीस पाहताच जुन्या पैशाचे वादाचे कारणावरून मोहम्मद शोएब याने फिर्यादीचा गळा पकडला व मोहम्मद अजीज याने त्याचे जवळ असलेल्या चाकू सारख्या हत्यार्याने फिर्यादीचे डाव्या पायाचे मांडीवर वार करून फिर्यादीस जखमी केले. व मोहम्मद अर्शद याने त्याचे जवळील चाकू ने फीचे डाव्या पायाचे मांडीचे मागील बाजूस वार



केला .त्यामुळे जखम होऊन रक्त स्त्राव झाला त्यांनी फ्रिर्यादीस शिवीगाळ करून जीवाने मारण्याची धमकी दिली अशा फि चे जबानी रिपोर्ट वरून तसेच मेडीकल सर्टी वरून आदेशाने गुन्हा दाखल केला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी उबेद अहमद शेख मुनीर वय २३ वर्ष व्यवसाय ड्रायव्हर बाळापुर ,बडा मोमीनपुरा आरोपी १) मोहम्मद अजीज शेख कासम २) मोहम्मद अर्षद मोहम्मद ऐसिन ३) मोहम्मद शहीद मोहम्मद मोहसीन तिन्ही बाळापुर बडा मोमीनपुरा घटनास्थळ शहाबाबू मैदान पातुर यांनी ८/४/२५ चे. रात्री १० वा दरम्यान फिर्यादी हे पातुर येथे शहाबाबू उर्स संदल यात्रेनिमित्त संध्याकाळी ५.३० वाजता आले असता, फिर्यादी व त्याचे मित्र यात्रेमध्ये आलेल्या पाळण्यामध्ये बसण्यास गेले व पाळण्या (झुल्या) मधून खाली उतरल्यानंतर तिथे यातील नमूद आरोपी १) मोहम्मद अजीज शेख कासम २) मोहम्मद अर्षद मोहम्मद ऐसिन ३) मोहम्मद शहीद मोहम्मद मोहसीन तिन्ही बाळापुर बडा मोमीनपुरा असे तिघे पाळणया( झुल्या ) जवळ आले त्यांनी फिर्यादीस पाहताच जुन्या पैशाचे वादाचे कारणावरून मोहम्मद शोएब याने फीर्यादीचा गळा पकडून व मोहम्मद अजीज याने त्याचे जवळ असलेल्या चाकू सारख्या हत्यार्याने फीचे डाव्या पायाचे मांडीवर वार करून फीर्यादीस जखमी केले व मोहम्मद अर्शद याने त्याचे जवळील चाकू ने फीचे डाव्या पायाचे मांडीचे मागील बाजूस वार केला त्यामुळे जखम होऊन रक्तस्त्राव झाला. व आरोपींनी फीस शिवीगाळ करून जीवाने मारण्याची धमकी दिली अशा फ्रि चे जबानी रिपोर्ट वरून तसेच डॉक्टर यांच्या मेडीकल सर्टीफिकेट वरून अप नंबर व कलम :-१०५/२०२५ कलम ११८(१),३५१(२)(३),३(५) प्रमाने ९ एप्रिल रोजी पातुर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पातुर पोलीस करीत आहेत.

# आयुष्य मंत्री प्रतापराव जाधव विद्यार्थ्यांच्या सदैव पाठीशी

**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :** पातुर येथील राष्ट्रवादी विद्यार्थीचे प्रदेश सचिव मो फरहान अमीन यांनी केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांची सदिच्छा भेट घेतली.



यावेळी शैक्षणिक व विशेषतः वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे विविध प्रश्न जसे शिष्यवृत्ती जातीचे प्रमाणपत्र उच्च शिक्षणासाठी पुढील व्यवस्था करणे अशा बाबी समोर करून फरहान अमीन यांनी साधक बाधक चर्चा केली. यावेळी आयुष मंत्री प्रतापराव जाधव साहेब यांनी विद्यार्थ्यांच्या सदैव पाठीशी असल्याचे सांगितले.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने तेल्हारा येथे शिवसेना पक्षाची आढावा बैठक संपन्न

**तेल्हारा,दि ११ (प्रतिनिधी) :** शिवसेनेचे मुख्य नेते नामदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या आदेशाने संपर्क प्रमुख तथा उपनेते मा.आमदार गोपीकीशन बाजोरिया साहेब यांच्या मार्गदर्शनात शिवसेना जिल्हाप्रमुख श्रीरंग दादा पिंजरकार यांच्या प्रामुख्य नेतृत्वाखाली आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आणि संघटन बांधणी यासंबंधी शिवसेना पक्षाची आढावा बैठक आज दिनांक ९ एप्रिल २०२५ रोजी शासकीय विश्रामगृह तेल्हारा येथे पार पडली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख श्रीरंग दादा पिंजरकार निवासी उपजिल्हाप्रमुख संतोष अनासने उप जिल्हाप्रमुख मनिष कराळे जिल्हा सचिव सतिष गोपनारायण अकोला शहर संघटक राजेश पिंजरकर युवा सेना उपजिल्हा प्रमुख विशाल चौधरी अकोट इत्यादी मान्यवरांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व संघटन बांधणी याविषयी बैठकीला मार्गदर्शन केले.प्रमुख पाहुण्यांच्या मार्गदर्शन उपस्थितीत तेल्हारा तालुका प्रमुख प्रविण वैष्णव शहर प्रमुख अनिकेत ढवळे यांच्या नेतृत्वाखाली हिवरखेड दिपक हिवराळे दानापुर दिनेश विखे सचिन नांदुरकार यांच्या सह तालुक्यातुन पक्षांम



ध्ये प्रवेश देण्यात आले.शिवसेना जिल्ह्याप्रमुख श्रीरंग दादा पिंजरकर यांनी आपल्या संबोधनातुन या बैठकीमध्ये आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पक्ष संघटना कशी मजबूत करता येईल या विषयावर एक महत्त्वाचे मार्गदर्शन केले. महायुती सरकारच्या वतीने तसेच महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री माननीय एकनाथजी शिंदे साहेब नेतृत्वाखाली सामान्य जनतेच्या हितासाठी ज्या सरकारी योजना राबवल्या आहेत त्या योजना प्रत्येक व्यक्तीपर्यत पोहोचल्या पाहिजे त्या अनुषंगाने योजनेचा प्रचार आणि प्रसार पक्षाच्या वतीने कसा करता येईल आणि सामान्य जनतेला त्या योजनेचा कसा लाभ होईल यावर सुद्धा एक महत्त्वपूर्ण चर्चा पार पडली यावेळी प्रत्येक पदाधिकारी यांच्याकडून आजपर्यत केलेल्यासंपूर्ण काम ाचा लेखाजोखा घेण्यात आला शहर व तालुक्यातील सर्व पदाधिकारी यांना स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक करीतातत्पर रहा असे आदेश देण्यात आले यावेळी प्रकाश पाटील चिकटे उपतालुकाप्रमुख बेलखेड सर्कल आदीत्य अग्रवाल उपतालुकाप्रमुख भांबेरी सर्कल वासुदेव आदि उपस्थित होते.



# बालांगण



# लिंग बदलणारे रिबन ईल

निसर्ग नानाविध रहस्यांनी भरलेला आहे. तो असंख्य आणि अद्वितीय प्राण्यांचे घरही आहे. चला तर, आज अशाच वयानुसार लिंग बदलणाऱ्या एका जीवांविषयी जाणून घेऊ या.

मित्रांनो, रिबन ईल हा समुद्री जलचर नर म्हणून जन्माला येतो आणि नंतर मादीमध्ये रूपांतरित होतो. ही अनोखी प्रक्रिया सागरी जगात खास मानली जाते. मुलांनो, रिबन ईल हा एक सुंदर समुद्री जीव असून तो सामान्य ईल माशांपेक्षा वेगळा आहे. ते प्रामुख्याने हिंदी महासागर आणि प्रशांत महासागराच्या उबदार पाण्याच्या भागात आढळतात. त्याचे शरीर लांब आणि पातळ म्हणजेच एखाद्या रिबनसारखे दिसते. म्हणून त्याला 'रिबन ईल' म्हणतात. सर्वात वेगळे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा चमकदार रंग. हा रंग वयानुसार बदलत राहतो. ते सहसा खडकांमध्ये आणि प्रवाळ खडकांमध्ये लपतात आणि लहान मासे आणि समुद्री कीटक खाऊन पोट भरतात.

रिबन ईलचे आयुष्य तीन टप्प्यात विभागले गेले असून यामध्ये त्याचा रंग आणि लिंग दोन्ही बदलते. म्हणजेच रिबन ईल तरुण असताना रंग पूर्णपणे काळा असतो. मात्र मोठा होतो तेव्हा त्याचा रंग गडद निळा होतो आणि तो पूर्ण नर बनतो. या टप्प्यात तो पुनरुत्पादनासाठी तयार असतो. हेच रिबन ईल मोठे होतात तसतसे त्यांचे शरीर पिवळे होते. आता ते मादीमध्ये रूपांतरित होतात आणि अंडी घालण्यास सज्ज होतात. म्हणजेच, प्रत्येक रिबन ईल नर आता मादी म्हणून आपले जीवन सुरू करतो.

रिबन ईल मासा त्याचे लिंग का बदलतो, हे जाणून घेऊ या. निसर्गातील काही जीवांमध्ये सिक्वेन्शियल हर्माफ्रोडिटिझम नावाची प्रक्रिया असते, ज्यामध्ये जीव त्यांचे लिंग बदलू शकतात. रिबन ईलच्या बाबतीत बघायचे

**अद्भूत**

तर समुद्रात यांच्या माद्या खूप कमी असतात. म्हणून नर ईल मोठ्या वयात पोहोचतो तेव्हा तो स्वतःला मादीमध्ये रूपांतरित करतो आणि यातूनच त्यांची प्रजनन प्रक्रिया सुरू राहू शकते. थोडक्यात, यामुळेच त्यांची संख्या अबाधित राहते आणि अस्तित्व धोक्यात येत नाही.

रिबन ईल जवळपास २० वर्षांपर्यंत जगतात. ते इतके लवचिक असतात की अगदी लहान छिद्रांमधूनही जाऊ शकते. पाण्याखाली राहूनही त्याच्यात वास घेण्याची अद्भुत क्षमता असते. त्यामुळेच ते दूरवरची शिकार शोधू शकतात. त्यांची जीभ सापाच्या जिभेसारखी दोन भागात विभागलेली असते. काही लोक त्यांना मत्स्यालयात देखील ठेवतात, परंतु इथे त्यांची काळजी घेणे खूप कठीण असते.

# साबणाचा शोध लागला कधी?



**जाणून घ्या**

आपल्या रोजच्या वापरात असणाऱ्या साबणाचा शोध कधी आणि कसा लागला हे तुम्हाला माहिती आहे का? छोट्या दोस्तांनो, साबणाच्या शोधाबद्दल अनेक कथा आहेत. परंतु सर्वात लोकप्रिय कथा प्राचीन रोमशी संबंधित आहे. असे म्हटले जाते की, रोमजवळ 'सापो' नावाची एक टेकडी होती. तिथे प्राण्यांची चरबी आणि लाकडाची राख यांच्या मिश्रणातून एक फेसयुक्त पदार्थ तयार होऊन नदीत वाहून येत असे. लोक या नदीच्या पाण्याने कपडे धुवायचे तेव्हा कपड्यांवरील डाग वा घाण सहजपणे निघून जात असल्याचे त्यांना जाणवले. म्हणजेच हा फेसयुक्त पदार्थ साबणाचा सर्वात जुना प्रकार होता. तेव्हा 'साबण' हा शब्दही या टेकडीच्या नावावरून आला असल्याचे समजले जाते.

इ.स.पू. २८०० मध्ये साबणाचा पहिला उल्लेख मेसोपोटेमियन संस्कृतीत आढळतो. तेव्हा प्राण्यांची चरबी आणि लाकडाची राख मिसळून साबण तयार केले जात असल्याचे सांगितले जाते. पुढे इ.स.पू. १५०० काळात प्राचीन इजिप्शियन लोकदेखील साबणासारखा पदार्थ वापरत असत. ते ऑलिव्ह ऑइल, प्राण्यांची चरबी आणि अल्कधर्मी पदार्थांपासून साबण बनवत असत. पुढे रोममध्ये पहिल्या शतकात आंघोळीसाठी लोक साबण वापरू लागले. प्राचीन भारतीय आणि चिनी संस्कृतींमध्येही हर्बल घटकांपासून बनवलेल्या साबणासारख्या गोष्टी वापरल्या जात होत्या. आयुर्वेदात स्वच्छतेसाठी नैसर्गिक घटकांचाही उल्लेख आहे.

मध्ययुगात, युरोपमध्ये स्वच्छतेचे महत्त्व कमी झाले आणि त्यामुळे अनेक रोगांचा प्रसार झाला. पण १२ व्या शतकात अरब शास्त्रज्ञांनी साबण बनवण्याच्या पद्धतीत आणखी सुधारणा केली.

त्यांनी ऑलिव्ह ऑइल आणि सुगंधी पदार्थांपासून उच्च दर्जाचे साबण बनवले जे नंतर युरोपमध्येही लोकप्रिय झाले. साबणाचे औद्योगिक उत्पादन १७ व्या आणि १८ व्या शतकात सुरू झाले. १९ व्या शतकात साबणाचा वापर झपाट्याने वाढला. हळूहळू शास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या प्रकारचे साबण तयार केले. आज आपल्याकडे अनेक प्रकारचे साबण उपलब्ध आहेत. ते आपण शारीरिक स्वच्छतेबरोबरच संसर्ग दूर करण्यासाठी, त्वचेची चमक टिकवण्यासाठी आणि त्वचा सुगंधी ठेवण्यासाठी वापरतो.

# हे करून बघा

**ॲप वर्ल्ड**

युजर्स व्हॉट्स ॲपवर स्टेटस अपलोड करतात. तुम्हीही तुमचे फोटो, व्हिडिओ तसंच संदेश स्टेटसमध्ये अपलोड करत असाल. काही स्टेटस खूप आकर्षक असतात. एखादं स्टेटस छानसा संदेश देऊन जातं. हा संदेश आपल्याकडे असायला हवा, असंही वाटून जातं. कोणी गमतीशीर व्हिडिओ अपलोड करतं. आपण अनेकांची स्टेटस बघतो. स्टेटसमधले फोटो, व्हिडिओ सेव्ह करता येत नाहीत, असा आपला समज असतो. पण प्रत्यक्षात आपण बघितलेले फोटो आणि व्हिडिओ ऑटो डाउनलोड होऊन सेव्ह होतात. ते नेमके कुठे सेव्ह होतात हे आपल्याला कळत नाही. ते भलत्याच फोल्डरमध्ये जाऊन बसतात. तेव्हा ऑटो सेव्ह झालेले फोटो आणि व्हिडिओ कसे बघायचे याविषयी...

फोनमध्ये 'गुगल फाईल्स' ॲप डाउनलोड करून घ्या. यानंतर ॲपच्या डाव्या बाजूला सेटिंग ऑप्शन दिलेला असेल. त्यावर टॅप करून 'शो हिडन फाईल्स' हा पर्याय ऑन करा. यानंतर व्हॉट्स ॲपवरच्या स्टेटसमध्ये फोटो आणि व्हिडिओ बघा. यानंतर 'गुगल फाईल्स' ओपन करून व्हॉट्स ॲप फोल्डरमध्ये जा. मग मीडियामध्ये 'स्टेटसेस' हा ऑप्शन असेल. तिथे तुम्हाला स्टेटसमधले व्हिडिओ आणि फोटो दिसतील. तुमच्या आवडीचे व्हिडिओ, फोटो दुसऱ्या फोल्डरमध्ये सेव्ह करता येतील.




## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) काश्मीरमधली प्रसिद्ध पश्मिना शाल कोणत्या प्राण्याच्या केसांपासून तयार केली जाते?
२) एशियान संघटनेचं मुख्यालय कुठे आहे?
३) भारत संयुक्त राष्ट्रांचा सदस्य कोणत्या वर्षी झाला?
४) जागतिक बँकेची स्थापना कोणत्या वर्षी झाली?
५) नाटोचं मुख्यालय कुठे आहे?
६) युनेस्कोचं मुख्यालय कुठे आहे?
७) जपानचा राष्ट्रीय खेळ कोणता?
८) होपमन कप कोणत्या खेळाशी संबंधित आहे?
९) पहिला क्रिकेट कसोटी सामना कोणत्या वर्षी खेळवण्यात आला?
१०) भारताच्या कसोटी संघाचे पहिले कर्णधार कोण?

उत्तर : १) बकरी २) जकार्ता ३) १९४५ ४) १९४४ ५) ब्रुसेल्स ६) पॅरिस ७) सुमो रेसलिंग ८) लॉन टेनिस ९) १८७७ १०) सी.के नायडू

# बर्फाचा गोळा खाताय?

दोस्तांनो, आता उन्हाळा चांगलाच जाणवू लागला आहे. या दिवसांमध्ये बर्फाचा गारेगार गोळा, थंड सरबत किंवा कुल्फी सारखे थंड पदार्थ खाताना भारी मजा येते ना... तुम्हीही बर्फाच्या गोळ्यासाठी हट्ट करत असाल. पण स्लशी म्हणजेच बर्फाचा गोळा खाणे आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते, हे तुम्हाला माहिती आहे का? अलिकडच्या एका अभ्यासातून दिसून आले आहे की स्लशीमध्ये असणारे ग्लिसरॉल मुलांमध्ये गंभीर आजार निर्माण करू शकते. म्हणूनच गोळा खात असाल तर काळजी घ्या.


गोळ्यामध्ये बर्फाचा चुरा, सरबत किंवा रस मिसळला जात असल्यामुळे तो थंड, चविष्ट आणि खूप चटपटीत लागतो. मात्र यातील ग्लिसरॉलमुळे मुलांच्या रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होणे (हायपोग्लायसेमिया) आणि चेतना गमावणे यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागू शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे. म्हणजेच स्लशी प्यायल्याने काही आजार होऊ शकतात. सरबते तयार करण्यासाठी वापरलेले पाणी वा बर्फ खाण्या-पिण्यायोग्य नसल्यास विषबाधा होण्याचा मोठा धोकाही असतो. या अभ्यासात असेही आढळून आले की, आरोग्यास घातक असणारा बर्फगोळा खाल्ल्यामुळे अनेक मुलांना रुग्णालयात दाखल करावे

**धोका ओळखा**



लागते. त्यांना न्यूरोइमेजिंग, फेफरे आणि इतर त्रासावर बराच काळ उपचार घ्यावे लागतात. त्यामुळेच हा धोका टाळण्यासाठी बर्फाचा गोळा खात्रीशीर आणि स्वच्छतेचे निकष पाळणाऱ्या ठिकाणीच खावा.महत्त्वाचे म्हणजे स्लशीमध्ये ग्लिसरॉलचे प्रमाण वेगवेगळे असते. त्यामुळेच मुलांसाठी कोणते प्रमाण सुरक्षित आहे याचा अंदाज लावणे कठीण आहे. म्हणूनच रस्त्यावरील विक्रेत्याकडून बर्फाचा गोळा घेणे टाळा. त्याऐवजी उसाचा ताजा रस किंवा थंडगार ताक, लस्सी, थंडावा देणारी फळे खाणे चांगले. त्यातही एखाद्या वेळी गाडीवर मिळणारा गोळा वा सरबत प्यायले आणि काही त्रास जाणवू लागला तर तातडीने आई-बाबांना सांगा. ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधला तर वेळीच उपचार होतील आणि पुढचा धोका टळेल.

**ठिपके जुळवा**



# गुदगुल्या का होतात?



तुम्हाला अचानक एखाद्याने गुदगुल्या केल्या तर काय होतं? एकतर तुम्ही खूप हसता, जमिनीवर लोळता आणि स्वतःला वाचवण्यासाठी इकडे तिकडे पळता... बरोबर ना? पण तेव्हा तुम्ही स्वतःला गुदगुल्या केल्या तर काय होतं बरं? काहीही होत नाही ना? असं का होतं... चला, जाणून घेऊ या.

मुलांनो, मेंदू इतका तीक्ष्ण आणि बुद्धिमान आहे की तो आपल्या सगळ्या कृती ओळखतो. म्हणूनच तुम्ही स्वतःला गुदगुल्या करण्याचा प्रयत्न करता तेव्हा मेंदूला आधीच काय करणार आहात हे माहिती असते. म्हणूनच शरीराला हा स्पर्श विचित्र वाटत नाही किंवा ते कोणतीही मजेदार प्रतिक्रियाही निर्माण करत नाही. दुसरीकडे, कोणी तुम्हाला गुदगुल्या करते तेव्हा मात्र मेंदू या स्पर्शाचा अंदाज घेऊ शकत नाही. त्यांच्यासाठी ही एक आश्चर्यचकित करणारी घटना ठरते आणि त्यामुळेच शरीर लगेच प्रतिक्रिया देते. तुम्ही हसायला सुरुवात करता.

**असं का होतं?**

सेरेबेलम हा मेंदूचा मुख्य नियंत्रक आहे. आपल्या मेंदूचा हा विशेष भाग शरीराच्या हालचालींवर नियंत्रण ठेवत असतो आणि तोच या संपूर्ण खेळाचा सूत्रधारी असतो. आपण स्वतःला गुदगुल्या करतो तेव्हा हा स्पर्श आपली स्वतःचीच क्रिया असल्याचे जाणतो आणि शरीर त्यावर थंड प्रतिक्रिया देते. परंतु कोणीतरी आपल्याला गुदगुल्या केल्यास तो एक नवीन अनुभव असतो. मग याला शरीराकडून लगेचच प्रतिक्रिया मिळते. याच कारणामुळे तुम्ही स्वतःला हाताने मारण्याचा प्रयत्न केला तर जास्त दुखापत होत नाही, परंतु दुसऱ्याने तसाच फटका मारला तर जास्त वेदना होतात.

मित्रांनो, गुदगुल्या करणे हा केवळ मनोरंजनाचा नाही तर आपल्या शरीराच्या सुरक्षाप्रणालीचाही एक भाग आहे. ही नैसर्गिक प्रतिक्रिया आपल्या पूर्वजांच्या काळातच विकसित झाली. तेव्हा मानव जंगलात राहायचा. त्यामुळे शरीराच्या संवेदनशील भागांचे संरक्षण करण्यासाठी याचा वापर केला जायचा. गुदगुल्या सहसा शरीराच्या संवेदनशील आणि असुरक्षित भागांमध्ये जाणवतात. जसे की मान, पोट आणि काखेमध्ये कोणी स्पर्श केल्यास गुदगुल्या होतात. कोणी आपल्याला गुदगुल्या केल्या तर मेंदूकडे हा भाग सुरक्षित नसल्याचा संदेश जातो आणि तात्काळ शरीर आपल्याला हालचाल करण्यास किंवा मागे हटण्यास भाग पाडते. त्यामुळेच गुदगुल्या सहन झाल्या नाहीत तर आपण त्या करणाऱ्या व्यक्तीला मारतो. ढकलतो आणि स्वतःची सुटका करून घेतो. आता कळले का गुदगुल्या होण्यामागचे गुपीत?

# झुरळ नव्हे हा तर रोबो



अमेरिकन शास्त्रज्ञांनी झुरळाच्या आकाराचा रोबो तयार केला आहे. हा रोबो जमिनीवर झुरळाप्रमाणेच तुरुतुरु चालतो. तो इतका बळकट आहे की माणसाचा पाय पडल्यावरही तुटणार नाही. नैसर्गिक आपत्तींमध्ये मदतकार्यासाठी या छोट्याशा रोबोचा वापर करता येईल, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. काही दुर्गम प्रदेशांमध्ये माणूस, जनावरं आणि उपकरणं पोहचू शकत नाहीत. अशा ठिकाणी हा रोबो पोहचू शकेल.

एखाद्या छोट्या आकाराचे रोबो सर्वसाधारणपणे खूप नाजूक असतात. माणसाचा पाय पडल्यावर तुटून जातात. त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. मात्र या रोबोच्या बाबतीत असं काहीच होणार नाही. याबाबतची चाचणीही शास्त्रज्ञांनी घेतली आहे.

**टेक फन**

या रोबोवर माणसएवढं वजन ठेवण्यात आलं. पण रोबो तुटला नाही किंवा त्यात कोणताही बिघाड झाला नाही.

भूकंपानंतर उपकरणं किंवा कुत्र्यांच्या मदतीने ढिगाऱ्याखाली दबलेल्या लोकांचा शोध घेताना बऱ्याच अडचणी येतात. म्हणूनच असे छोट्या आकाराचे रोबो तयार केले जातात. हे रोबो ढिगाऱ्याखालच्या माणसांचा शोध घेऊ शकतात. यामुळे अनेकांचा वाचवता येऊ शकतो. या रोबोचं वजन खूपच कमी आहे. मात्र तो ६० किलो वजन अगदी सहज उचलू शकतो. तो स्वतंत्रपणे काम करू शकतो. आता यामध्ये गॅस सेन्सर्सही बसवण्यात येणार आहेत.

## दोस्त हे मस्त

### हे तर निसर्गदूत



प्राणी, पक्षी निसर्गाच्या खूप जवळ असतात. निसर्गातल्या बदलांबाबत त्यांच्याकडून सूचना मिळू शकतात. या मुक्या जीवांना सगळ्यात आधी नैसर्गिक आपत्तींची कुणकुण लागते. म्हणूनच त्यांच्या वागणुकीवरून आपण हवामानाचा अंदाजही बांधू शकतो. आता आपल्या सभोवताली दिसणाऱ्या पक्ष्यांकडे बघा. पक्षी आकाशात मुक्तपणे उडत असतील तर हवामान चांगलं राहणार असल्याचं समजावं. निरभ्र आकाशात पक्षी मोकळेपणाने विहार करतात. मात्र जमिनीलगत उडणारे पक्षी वातावरणातल्या बदलांची सूचना देतात. वादळ येणार असेल, जोरात वारे वाहणार असतील तर पक्षी जमिनीलगत उडू लागतात.

## खादाडी

### हेल्दी कोल्डड्रिंक



मुलांनो, या सुट्टीत तुम्हाला मस्तपैकी इलेक्ट्रिक सोडा बनवून पिता येईल. यासाठी एक लिंबू, तीन चमचे मध, प्रत्येकी एक चमचा जिरेपूड आणि चाट मसाला, सोड्याची एक बाटली, बर्फाचे तुकडे, आठ-दहा पुदिन्याची पानं हे साहित्य घ्या. आधी एक ग्लास घ्या. त्याच्या तळाशी दोन चमचे लिंबाचा रस आणि मध घाला. त्यानंतर जिरेपूड आणि चाट मसाला घालून सर्व पदार्थ नीट एकत्र करा. आता ग्लासमध्ये सोडा घाला आणि चमच्याने ढवळून घ्या. त्यात बर्फाचे तुकडे आणि पुदिन्याची पानं घाला. मस्तपैकी प्या.

## स्टडी टिप्स

### सुट्टीत अभ्यास करताना...

मुलांनो, प्रत्येकाची अभ्यास करण्याची पद्धत वेगवेगळी असते. काहींना अधूनमधून विश्रांतीची गरज असते तर काही सलग दोन ते तीन तास अभ्यास करू शकतात. वाचलेलं नीट लक्षात ठेवण्यासाठी अभ्यास करण्याच्या पद्धतीत बदल करू नका.




आपल्या नेहमीच्या पद्धतीने अभ्यास करणं जास्त चांगलं असल्याचं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. त्यामुळे तुम्ही तुमच्याच पद्धतीने अभ्यास करा.

## योगा टाईम

### अशी आहे वरुण मुद्रा

दोस्तांनो, विविध मुद्रांमुळे आरोग्याला लाभ होतात. अशीच एक लाभदायी मुद्रा म्हणजे वरुण मुद्रा. ही मुद्रा करताना करंगळी आणि अंगठ्याचा वरचा भाग एकमेकांना चिकटवा. उरलेली तीन बोटं सरळ ठेवा. ही मुद्रा तुम्ही कोणत्याही वेळी करू शकता. यामुळे शरीरातल्या जलतत्त्वाचं संतुलन साधलं जातं आणि विविध विकारांना आळा घालता येतो.



## शहर विकास आराखड्यात सुधारणेतून

# दीक्षाभूमीला जागा देणे शक्य

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

उच्च न्यायालयात नागपूर : आंतरराष्ट्रीय दर्जाच्या दीक्षाभूमी स्मारकाचा विस्तार करण्यासाठी शेजारची जमीन देण्याची मागणी करण्यात येत आहे.

अनेक वर्षांपासून ही मागणी राज्य शासनाकडे प्रलंबित आहे. याबाबत उच्च न्यायालयातही याचिका दाखल करण्यात आली आहे. दीक्षाभूमीला शेजारची जागा देण्यासाठी कायदेशीर रस्ता सुचवा, अशा सूचना न्यायालयाने याप्रकरणातील याचिकाकर्त्यार्ला केल्या होत्या.

याचिकाकर्ते ॲड.शैलेश नारनवरे यांनी दीक्षाभूमीला कशी जागा दिली जाऊ शकते याबाबत कायदेशीर मार्ग न्यायालयात सादर केला.

**विकास आराखड्यात बदल करा**

दीक्षाभूमीच्या विस्ताराकरिता आरोग्य विभागाची १६.४४ एकर व कापूस संशोधन संस्थानची ३.८४ एकर जमीन मागितली जात आहे. ४ सप्टेंबर २०२४ रोजी न्यायालयाने ही जमीन दीक्षाभूमीला कशी मिळवून दिली जाऊ शकते, याची कायदेशीर माहिती ॲड. नारनवरे यांना मागितली होती. त्यामुळे त्यांनी यासंदर्भात दिवाणी अर्ज दाखल केला आहे.

शहराच्या नियोजन प्राधिकरणला महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना कायद्यातील कलम ३७ अनुसार विकास आराखड्यामध्ये दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे. त्यांतर्गत संबंधित जमीन धार्मिक व सांस्कृतिक उद्देशाकरिता आरक्षित करून दीक्षाभूमीला वाटप केली जाऊ शकते.



दीक्षाभूमी राष्ट्रीय महत्व असलेले धार्मिक व ऐतिहासिक स्मारक असून भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांची येथे येण्याची संख्या सातत्याने वाढत आहे. दीक्षाभूमीला अतिरिक्त जमीन मिळाल्यास तेथे अनुयायांकरिता आवश्यक सुविधा विकसित करता येतील. राज्यातील इतर तीर्थक्षेत्रांचा विकास अशाच पद्धतीने करण्यात आला आहे. मूलभूत व धार्मिक अधिकार लक्षात घेताही दीक्षाभूमीचा तातडीने विकास करणे गरजेचे आहे, असे ॲड. नारनवरे यांनी अर्जात म्हटले आहे.

भूमी अधिग्रहण कायदा, २०१३ नुसार राज्य शासनाला सार्वजनिक वापरासाठी भूमी अधिग्रहण करण्याचे अधिकार आहेत. अधिग्रहण करण्याच्या प्रक्रियेत राज्य शासनाला सर्वप्रथम सार्वजनिक नोटिस काढावा लागेल. यानंतर सामाजिक परिणामाचा अभ्यास करून अधिग्रहणाची किंमत ठरवली जाईल.

यानंतर संबंधित जमिन मालकाला योग्य प्रमाणात नुकसान भरपाई देऊन अधिग्रहण केले जाऊ शकते, अशी माहिती अर्जात दिली गेली आहे. मेट्रोचे कार्यालय बनविण्यासाठी राज्य शासनाने आरोग्य विभागाची जागा अशा पद्धतीने अधिग्रहित केली आहे.अलिकडेच मोदी यांच्या दौऱ्यात स्मारक समितीने याबाबत निवेदन दिल्याची माहितीही न्यायालयाला अर्जातून दिली गेली.

## वक्फ न्यायाधिकरणाकडे जा....
## उच्च न्यायालयाचे आदेश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

यवतमाळ येथील टांगा चौकातील जामा मशिदीच्या व्यवस्थापनाबाबत सुरू असलेल्या वादात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने हस्तक्षेप करण्यास नकार दिला. वक्फ अधिनियम, १९९५ नुसार या प्रकरणाबाबत निर्णयाचा प्राथमिक अधिकार वक्फ न्यायाधिकरणाकडे आहे. उच्च न्यायालयात थेट याचिका दाखल करता येणार नाही. त्यामुळे हा वाद वक्फ न्यायाधिकरणाकडे सोडवावा, असा आदेश न्या.एम.एस जवळकर यांच्या खंडपीठाने दिला.

जामा मशिद ट्रस्टमधील सध्याचे व्यवस्थापक नयमुल्ला खान आणि इतरांनी ही याचिका दाखल केली आहे. याचिकेनुसार, टांगा चौक येथील जामा मशिदच्या व्यवस्थापनामधील पूर्वीचे व्यवस्थापक (मुतावल्ली) यांच्या निधनानंतर नयमुल्ला खानसह इतर याचिकाकर्ते मशिदच्या व्यवस्थापनाची जबाबदाची पार पाडत आहेत.

व्यवस्थापकीय मंडळात बदल करण्यासाठी याचिकाकर्त्यांनी रीतसर अर्ज राज्याच्या वक्फ बोर्डकडे दाखल केला. या अजार्पाठोपाठ मशिदच्या व्यवस्थापनात दावा करणारे हबीबुर रहमान मलानी आणि इतरांनी मंडळाकडे दुसरा अर्ज दाखल केला.

याचिकाकर्त्यांना या दुसऱ्या अजार्बाबत काहीही माहिती न देता राज्य वक्फ बोडार्चे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने ३१ मे २०१३ रोजी हबीबुर रहमान मलानी यांचा अर्ज मंजूर केला.

याचिकाकर्ते नयमुल्ला खान यांनी या निर्णयाला महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाच्या औरंगाबाद खंडपीठात आव्हान दिले. वक्फ न्यायाधिकरणाने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला जुन्या आदेशाचा फेरविचार करण्याचे आदेश दिले.

यानंतर १३ फेब्रुवारी २०२४ रोजी वक्फ न्यायाधिकरणाने हबीबुर रहमान आणि इतरांचा अर्ज फेटाळून लावला आणि याचिकाकर्त्यार्ने सादर केलेला ह्यचेंज रिपोर्टह्ण स्वीकार केला. हबीबुर रहमान यांनी या निर्णयाला वक्फ बोर्डाकडे आव्हान दिले. याविरोधात याचिकाकर्ते नयमुल्ला खान यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली.

याचिकाकर्त्यार्ने न्यायालयात युक्तिवाद केला की वक्फ बोर्डाला त्याने घेतलेल्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे न्यायालयाने यात हस्तक्षेप करावा, अशी विनंती याचिकाकर्त्यांनी केली. दुसरीकडे, प्रतिवादी हबीबुर रहमान यांनी दावा केला की वक्फ संपत्ती संबंधित सर्व प्रकरणावर निर्णयाचा अधिकार वक्फ न्यायाधिकरणाकडे आहे.

याचिकाकर्ते यासाठी थेट उच्च न्यायालयात याचिका दाखल करू शकत नाही. यासाठी आधी वक्फ न्यायाधिकरणाकडे याचिका दाखल करण्याची तरतुद असल्याचा दावा करत ही याचिका फेटाळून लावण्याची विनंती प्रतिवादी हबीबुर रहमान यांनी केला.

उच्च न्यायालयाने प्रतिवाद्यांचा युक्तिवाद मान्य करत याचिका फेटाळून लावली आणि वक्फ न्यायाधिकरणाकडे याचिका दाखल करण्याची सूचना केली.

## आईच्या डोळ्यादेखत चिमुकला बसखाली चिरडून ठार

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ११ :

अमरावती ते बडनेरा मार्गावर जुन्या वस्तीतील सजनाजीबुवा हनुमान मंदिराजवळ एसटी महामंडळाच्या बसने दुचाकीला जबर धडक दिल्याने सात वर्षाच्या चिमुकल्याचा मृत्यू झाला, तर आई जखमी झाली. रुद्र मंगेश घीडाणी (७, रा. न्यू प्रभात कॉलनी, नवीवस्ती, बडनेरा) असे मृत चिमुकल्याचे नाव आहे. तो अमरावती ते बडनेरा मार्गावरील एका शाळेत पहिल्या वर्गामध्ये शिकत होता.

नेहमीप्रमाणे त्याच्या आईने त्याला शाळेत सोडून देण्यासाठी दुचाकीवर घेतले. मागार्तील सजनाजी बुवा हनुमान मंदिराजवळ अचानकपणे बसने दुचाकीला जबर धडक दिली.

दुचाकीवर मागे बसलेला रुद्र हा बसच्या मागील चाकाखाली आला, तर त्याची आई विरुद्ध दिशेने फेकली गेली. अपघात घडल्याचे निदर्शनास येताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जबर जखमी झालेल्या रुद्रला नागरिकांनी अमरावतीला उपचारासाठी घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, तेवढ्यात त्याचा मृत्यू झाला. चिमुकल्याच्या मृत्यूमुळे बडनेरा नवी वस्ती परिसरात शोकमय वातावरण आहे.

## डेंग्युच्या रुग्णाचे सहा लाख बिल कसे?

■ वृत्तसंस्था
हिंगोली, दि. ११ :

छत्रपती संभाजीनगर येथे डेंग्यूच्या रुग्णाचे दहा दिवसाचे औषधीच्या खर्चासह रुग्णालयाचे असे सहा लाख रुपयांचे देयक मागणाऱ्या रुग्णालय प्रशासनाला शिंदे गटाचे आमदार संतोष बांगर यांनी चांगलेच फटकारले.

अमृत पाजलेस का?
आ. संतोष बांगर डॉक्टरवर संतापले



कळमनुरी विधानसभा मतदारसंघातील आदिती माणिकराव सरकटे या मुलीला डेंग्यूच्या आजाराचे निदान झाले होते. त्या मुलीला उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. रुग्णालय प्रशासनाने मुलीची प्रकृती गंभीर असल्याचे सांगत सुमारे तीन लाख रुपयांची औषधी मागवली. पैसे खर्च झाले तरी चालतील पण मुलीला धोका होता कामा नये या अशाने मुलीच्या कुटुंबीयांनी पदरमोड करून औषधीच्या खर्च केला.

त्यानंतर रुग्णालय प्रशासनाने सरकटे कुटुंबीयांकडे दोन लाख 80 हजाराची देयक दिले होते. त्यापैकी सरकटे कुटुंबीयांनी एक लाख 80 हजार रुपये जमा देखील केले. त्यानंतर रुग्णालय प्रशासनाकडून आणखी 85 हजार रुपये जमा करण्याची मागणी करण्यात आली. मात्र हाती काहीही शिल्लक नसल्यामुळे सरकटे कुटुंबीयातील नातेवाईकाने थेट आमदार संतोष बांगर यांच्याशी संवाद साधला. त्यांना सर्व परिस्थिती समजावून सांगितली.

त्यानंतर मात्र संतापलेल्या आमदार बांगर यांनी रुग्णालय प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. डेंग्यूच्या रुग्णाचे दहा दिवसात सहा लाख रुपये कुठल्या आधारावर होतात अशी विचारणा त्यांनी केली. रुग्णालय प्रशासनाने संबंधित रुग्ण गंभीर होता असे सांगत वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. मात्र तुम्ही रुग्णाला अमृत पाजले का? असा सवाल त्यांनी केला. रुग्णांची पिळवणूक करू नका अशी विनंती त्यांनी रुग्णालय प्रशासनाला केली. मात्र त्या उपरही रुग्णालय प्रशासनाने त्यांची बाजू कशी योग्य आहे हे मांडण्याचा प्रयत्न केला.

## बिबट्यांच्या मृत्यूप्रकरणी एकास अटक

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ११ :

बुलढाणा तालुक्यातील जनुना-गुम्मी शिवारात मागील एका महिन्यापूर्वी दोन बिबटयांचा संशयास्पद मृत्यू झाला होता. बिबट्यांचा मृत्यू प्रकरणी वन विभागाने बुलढाणा तालुक्यातील गुम्मी गावातून एका इसमास अटक केली आहे. त्याची कसून चौकशी करण्यात येत आहे.

या बिबट्यांना मटणातून विष कालवून ठार करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. या घटनेत आणखी काही आरोपी असल्याची दाट शक्यता असून वन विभाग कर्मचाऱ्यांचे पथक त्या दृष्टीने तपास करीत आहे. बुलढाणा वन परिक्षेत्रातील गिरडा, गुम्मी जनुना शिवार परिसरातील दाट जंगलात बिबट्यांसह विविध जंगली प्राण्यांचा अधिवास आहे. यातील जनुना, गुम्मी शिवारात कमी अधिक एक महिन्यापूर्वी दोन बिबट्यांचा संशयास्पद मृत्यू झाला होता. बुलढाणा तालुक्यातील गुम्मी येथील रहिवासी आरोपी सुनिल रामदास दांडगे (वय ३५) याला अटक केली आहे. तसेच वन विभागाच्या तपास चमुने जनुना गाव शिवार परिसरातून बिबट्याची हाडे जमा केली होती.

## बिले मंजुरीसाठी अभियंत्याने मागितली सव्वा चार लाख रूपयांची लाच

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. ११ :

**झेडपीचा अधिकारी व परिचर जाळ्यात**

चंद्रपूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई करीत जिल्हा परिषदमधील ग्रामीण पाणीपुरवठा विभागात कार्यरत कार्यकारी अभियंता, वरिष्ठ सहायक ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व कंत्राटी परिचर यांना ४ लाख २० हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ अटक केली.

लाचलुचपत विभागाने १० एप्रिल रोजी ही कारवाई केली. या प्रकरणी आज ११ एप्रिल रोजी तिघांविरोधात चंद्रपूरच्या रामनगर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवण्यात आली आहे. या कारवाईमुळे जिल्हा परिषद वतुर्ळात चांगलीच खळबळ उडाली आहे.

शासनाच्या जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत जिवती आणि राजुरा तालुक्यातील २३ गावांमध्ये पाणी पुरवठा संबंधी कामे जिवती येथील कंत्राटदाराने केले होते. १० गावातील कामांचे बिले ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर येथे मंजुरी करिता सादर केले होते, त्यापैकी ५ गावातील कामांचे ४३ लक्ष रुपयांचे बिले कंत्राटदार यांना मिळाले. उर्वरित बिले मंजूर करण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता हर्ष यशोराम बोहरे यांनी ४ लाख रुपयांची लाच संबंधित कंत्राटदाराला मागितली.

लाचेची रक्कम वरिष्ठ सहायक सुशील गुंडावार यांच्याकडे देण्यास सांगितले. वरिष्ठ अधिकाऱ्याला ४ लाख रुपये मिळणार ही बाब गुंडावार यांना समजताच त्यांनी सुद्धा स्वतःसाठी २० हजार रुपयांची लाच मागितली. दोन्ही अधिकाऱ्यांचे एकूण ४ लाख २० हजार रुपये द्यावे लागणार असे समजताच कंत्राटदार यांनी चंद्रपूर एसीबीकडे याबाबत तक्रार दिली.

तक्रार प्राप्त झाल्यावर ७ एप्रिल ते ९ एप्रिल रोजी तक्रारीची पडताळणी करण्यात आली. १० एप्रिल रोजी चंद्रपूर लाचलुचपत विभागाने सापळा रचला असता चंद्रपूर जिल्हा परिषद परिसरात वरिष्ठ सहायक सुशील गुंडावार यांनी ४ लाख २० हजार रुपये पंचासमक्ष स्वीकारत, लाचेच्या रकमेतील २० हजार रुपये स्वतःसाठी काढले आणि उर्वरित ४ लाख रुपये परिचर मतीन शेख यांच्याकडे देत साहेबांच्या घरी नेऊन द्या असे सांगितले. शेख यांनी सदर रक्कम कार्यकारी अभियंता हर्ष बोहरे यांच्या घरी नेऊन दिली असता त्यावेळी लाचलुचपत विभागाने हर्ष बोहरे, सुशील गुंडावार व मतीन शेख यांना रंगेहाथ अटक केली.

याप्रकरणी ११ एप्रिल रोजी तिन्ही लोकसेवक विरोधात रामनगर पोलीस स्टेशन चंद्रपूरमध्ये तक्रार नोंदवण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी लाचलुचपत विभागाने तहसीलदार व तलाठी यांच्यावर कारवाई केली होती. आता झेडपीचे अधिकारी लाचखोरी मध्ये अडकले आहेत.

## पत्नीचा गळा दाबून मुख्याध्यापकाची आत्महत्या



■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ११ :

आजारपणातून सुटका करतो म्हणत सेवानिवृत्त पतीने पत्नीची हत्या करत स्वतःही आत्महत्या केली. नाशिकच्या सावरकरनगरमध्ये मुरलीधर जोशी यांनी पत्नीची हत्या केली. त्यानंतर स्वतः गळफास घेत जीवन संपवले. आत्महत्येआधी त्यांनी चिठ्ठीही लिहून ठेवली होती.

लोखंडी कपाटात अंत्यविधीचे पैसे ठेवले आहेत. माझा देहदान करा, तुमची इच्छा असल्यास पत्नीचा अंत्यविधी करा. घर काम करणाऱ्या सीमाने खूप सेवा केली तिला 50 हजार द्या, असे या चिठ्ठीत नमूद केले आहे.

एकदंत अपार्टमेंटमध्ये राहणारे मुरलीधर जोशी (78) असे आत्महत्या केलेल्या वृद्धाचे नाव असून त्यांच्या पत्नी लता जोशी ( 71) असे खून झालेल्या वृद्धेचे नाव आहे. जोशी दांपत्य हे दोघेही सेवानिवृत्त मुख्याध्यापक होते. त्यांना दोन मुले असून एक प्राचार्य तर दुसरा लघुउद्योजक आहे.

मुरलीधर जोशींनी डायनिंग टेबलावर सुसाईड नोट ठेवली असून, मी माझ्या पत्नीच्या आजाराला कंटाळून आत्महत्या करत आहे. याचाशी कोणाचा काहीही संबंध नाही. मी खुशीने आत्महत्या करत आहे. तसेच मी लताचा गळा दाबून शेवट करत आहे. पोरांनी माफ करावे. सीमाला 50 हजार रुपये द्यावे. ती बाहेर गेली असताना मी हे कृत्य करत आहे. तिचा संबंध नाही, असे त्यात नमूद केले आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांना वेतन चिंता

: साप्ताहिक संवाद :

लोकरंग

प्रवाशांच्या सोयीसाठी सर्वस्तरावरील प्रयत्न करून देखील मागील काही महिन्यात राज्य परिवहन महामंडळाची अर्थात एसटी ची अवस्था अत्यंत बिकट आहे. एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांना सातत्याने अर्थचिंता सतावते आहे. एसटी महामंडळाकडे निधीची कमतरता असल्यामुळे या महिन्यात तर कर्मचाऱ्यांच्या वेतनास विलंब झालेला आहे. एसटी महामंडळाची झालेली दशा आणि पुढील काळातील दिशा याच संदर्भात एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**एसटी कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याचे वेतन विलंबाने झालेले आहे असं का?**

● येत्या काही दिवसात एसटी महामंडळातील प्रवासी गर्दीचा हंगाम सुरु होणार आहे. या हंगामात प्रवासी वाहतुकीचा भार वाहणाऱ्या चालक मालकांना मात्र पगाराची चिंता सतावत आहे.एसटी तील ८७ हजार कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याचा निम्माच पगार एप्रिल महिन्यात जमा झालेला आहे. महामंडळाकडे निधीच नसल्याने निम्माच पगार कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आला.

एसटी महामंडळात झालेल्या संपानंतर राज्य सरकारने एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या पगाराची जबाबदारी स्वीकारली होती. सद्य स्तिथीत राज्य सरकारकडून एसटी प्रवासी प्रतिपूर्तीच्या रूपाने निधी महामंडळाला पुरवला जातो. एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी ३५० ते ३६० कोटींची आवश्यकता असते. मात्र गेल्या १० महिन्यापासून कर्मचारी भविष्य निर्वाह निधी देखील जमा करण्यात आलेला नाही.

**वेतन विलंब या प्रश्नावर एसटी महामंडळ कर्मचाऱ्यांची मागणी काय आहे?**

● निधीच्या कमतरतेमुळे एसटी कर्मचाऱ्यांचा पगार रखडला. कर्मचारी आणि सुरक्षा रक्षकांना देखील त्याचा फटका बसला. एसटीतील ८० टक्के कर्मचाऱ्यांवर विविध कर्ज असून पगाराच्या अनियमिततेमुळे मासिक हप्त्यांवर परिणाम होतो. निम्म्या पगारात हप्ता, घरखर्च, शिक्षणाचा खर्च कसा करायचा? असे प्रश्न कर्मचाऱ्यांपुढे आहेत. ४० ते ४२ अंश तापमानात प्रवासी सेवा चालक वाहकांकडून विना तक्रार दिली जाते. यामुळे सरकारने प्राधान्याने महामंडळाला निधी उपलब्ध करून द्यावा अशी आमची मागणी आहे.

**या प्रश्नावर कर्मचारी संघटनेची पुढील दिशा काय असणार आहे?**



● एसटी महामंडळाच्या इतिहासात प्रथमच कर्मचाऱ्यांना निम्मा पगार देण्यात आलेला आहे. याला सरकारच जबाबदार आहे. कर्मचार्यांच्या वेतनाच्या समस्येवर राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी कर्मचाऱ्यांच्या पगाराचा प्रश्न तातडीने सोडविण्याच्या सूचना सचिवांना दिलेल्या आहेत. मार्च महिन्यातील पगारासाठी अप्पर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालकांची बैठक १५ एप्रिल रोजी आयोजित केली आहे. या बैठकीनंतर संघटनेची पुढील दिशा ठरणार आहे.

• • •

## मेघालयातील जग प्रसिध्द डॉकी तलाव



मेघालय हे ईशान्य भारतातील सर्वात सुंदर राज्यांपैकी एक आहे. मेघालयमध्ये अनेक सुंदर पर्यटनस्थळे आहेत. येथे तुम्हाला पर्वत रांगा, उंच पठार, सुंदर धबधबे, नद्या, हिरवी कुरण तसेच नैसर्गिक सौंदर्य पाहायला मिळेल.

मेघालयची राजधानी शिलाँग हे पर्यटनासाठी अतिशय लोकप्रिय ठिकाण आहे. दुसरीकडे, मेघालयचे चेरापुंजी संपूर्ण जगात सर्वाधिक पावसासाठी प्रसिद्ध आहे. दरवर्षी लाखो पर्यटक मेघालयला भेट देण्यासाठी येतात. जरी मेघालयमध्ये अनेक पर्यटन स्थळे आहेत.

मेघालयची राजधानी शिलाँग हे एक सुंदर हिल स्टेशन आहे. या हिल स्टेशनच्या आजूबाजूला हिरवाई दिसते. सुंदर धबधबे आणि उंच टेकड्या आणि सुंदर जंगलांच्या मधोमध असलेल्या या शहरात सर्व सुविधाही उपलब्ध आहेत. नैसर्गिक सौंदर्यात आरामशीर सुट्टी घालवण्यासाठी येथे येऊ शकता.मेघालयमध्ये स्थित, डॉकी तलाव त्याच्या सौंदयार्साठी जगभरात प्रसिद्ध आहे.

या तलावाचे पाणी अगदी काचेसारखे चमकते आणि स्वच्छ आहे. पावसाळ्यात डक्की तलावाचे दृश्य अधिकच सुंदर होते. पावसाळ्यात उमंग टोक नदीवर बोट शर्यतीचे आयोजन केले जाते, त्यात सहभागी होऊन मन प्रसन्न होते. चेरापुंजी जगातील सर्वाधिक पाऊस पडण्यासाठी प्रसिद्ध आहे. तसेच हे ठिकाण खूप हिरवेगार आणि सुंदर आहे, जिथे अनेक धबधबे आहेत. निसर्गप्रेमींसाठी हे ठिकाण योग्य आहे. चेरापुंजीला झाडांच्या मुळापासून विकसित नैसर्गिक पूल आहेत, तसेच डवकी, नोहकालिकाई, मवस्माई गुहा ही चेरापुंजीची प्रमुख पर्यटन स्थळे आहेत.

मेघालयला गेले तर मौसिनराम सहलीला जाऊ शकतात. पावसाळ्याचा आनंद लुटण्यासाठी इथे येऊ शकता. मावलिनांग हे भारतातील सर्वात सुंदर आणि स्वच्छ गाव आहे. पावसाळ्यात तुम्ही मौसिनरामला भेट देऊ शकता.

• • •

## मुंग्यांचे मनोरंजक विश्व

मुंग्या हा कीटक आपल्या चांगलाच परिचयाचा आहे. उन्हाळ्यात, पावसाळ्यात या मुंग्यांच्या झुंडीच्या झुंडी घराघरातून दिसतात. मुंग्या एका ठिकाणी साठविलेले अन्न दुसरीकडे नेताना पाहिल्या की हमखास पाऊस येणार असा होरा बांधला जातो व तो खराही आहे. तोंडात कसला ना कसला अन्नाचा कण, मेलेली झुरळे, बारीक किडे धरून कुठेही न थांबता व न थकता सतत धावपळ करणाऱ्या मुंग्या तसा कुतुहलाचा विषय आहे. मात्र आपल्याला या मुंग्याविषयी फारच थोडी माहिती असते. जगात १२ हजार प्रकारच्या मुंग्या आहेत. आपण नेहमी लाल व काळ्या रंगाच्या मुंग्या पाहतो पण हिरव्या रंगाच्या मुंग्याही असतात.

मुंगी तिच्या वजनाच्या २० पट अधिक वजन वाहून नेऊ शकते. मुंग्यांमध्ये एक राणी मुंगी असते तिला पंख असतात. राणी मुंगी लाखो अंडी घालते. मुंग्यांचे सरासरी आयुष्य २८ वर्षांचे असते तर राणी मुंगीचे आयुष्य सरासरी ३० वर्षांचे असते. मुंग्यांना कान नसतात. जमिनीच्या कंपनांवरून त्या अंदाज घेतात. मुंग्या एकाच रांगेत चालतात. कारण त्यांच्यामधून एक प्रकारचा पातळ पदार्थ बाहेर पडतो व त्याचा वेध घेऊनच मागच्या मुंग्या चालतात. मेलेल्या मुंगीच्या शरीरातून एक प्रकारचे रसायन पाझरते त्यावरून बाकी मुंग्या ती मेल्याचे जाणतात.

अन्नाची साठवण फक्त माणूस व मुंग्याच करतात.पृथ्वीवरील माणसांचे एकत्र जेवढे वजन होईल तेवढ्याच वजनाच्या मुंग्या पृथ्वीवर आहेत. डायनोसोरच्या काळातही मुंग्या होत्याच. आता बोला!



संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## बावणे यांना निलंबित करून संपत्तीची चौकशी करा

### देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडेंची व्यवस्थापकीय संचालकांकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. ११ :

गडचिरोली जिल्ह्याच्या आदिवासी विकास महामंडळ उपप्रादेशिक कार्यालय कुरखेडा अंतर्गत आदिवासी विविध कार्यकारी संस्था देऊळगाव खरेदी केंद्रावर १ कोटी ५३ लाखाचा गैरव्यवहार झाला होता. तत्कालीन जिल्हाधिकारी अविशांत पंडा यांनी तात्काळ संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेशही दिले होते. कोटलावार प्रकरणात तत्कालीन प्रभारी प्रादेशिक व्यवस्थापक मुरलीधर बावणे यांची संशयास्पद भुमिका लक्षात घेता त्यांना तात्काळ निलंबित करून त्यांच्या संपत्तीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी आदिवासी विकास महामंडळ नाशिकचे व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

गडचिरोली जिल्ह्यात पणन हंगाम २०२२-२३ मध्ये सीएमआर मिलींग प्रकरणात चौकशी समितीच्या अहवालानुसार दोषी आढळलेल्या तसेच अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या निर्णयानुसार जे गिरणीधारक सॉरटॅक्स अथवा पॅराबाईल्ड याच प्रकारचे काम करत असेल व मागील हंगाम २०२२-२३ मध्ये दोषी असलेल्या मिलर्सना भरडाईचे काम देण्यात येऊ नये असे स्पष्ट आदेश आहेत. असे असतांना आदिवासी विकास महामंडळ गडचिरोलीचे तत्कालीन प्रभारी प्रादेशिक व्यवस्थापक मुरलीधर बावणे यांनी मिलींग मध्ये दोषी असलेल्या व सॉरटॅक्स/पॅराबाईल्डचे काम करणाऱ्या व चौकशी समितीच्या अहवालात दोषी आढळून आलेल्या गिरणीधारकांसोबत करारनामे केले असल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती.



मुरलीधर बावणे

तत्कालीन प्रभारी प्रादेशिक व्यवस्थापक तसेच भरडाई समन्वय समिती सदस्य सचिव मुरलीधर बावणे यांनी शासन परिपत्रकाला हरताळ फासून वडसा येथील मे. मायाश्री ॲग्रो इंडस्ट्रीज, कुरुड येथील मे. माँ शारदा फुड प्रॉडक्ट व आरमोरी येथील जी. पी. ॲग्रो इंडस्ट्रीज या पॅराबाईल्ड/सॉरटॅक्सचे काम करणाऱ्या व पणन हंगाम २०२२-२३ ला चौकशी समितीने केलेल्या चौकशीत दोषी आढळून आलेल्या गिरणीधारकांशी करारनामे केल्याची माहिती आदिवासी विकास महामंडळ गडचिरोलीच्या प्रादेशिक कार्यालयाकडुन माहिती अधिकारात दिली होती.

दरम्यान, सदर कार्यालयाकडुन राईसमिलर्स सोबत करारनामा करतेवेळी कोणत्याच प्रकारचे कागदपत्रे मागविण्यात येत नसल्याची माहिती देण्यात आली होती.

विशेष म्हणजे करारनामा करताना एस.एस.आय. नोंदणी प्रमाणपत्र, कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रक्रियादार असल्याचे प्रमाणपत्र, जीएसटी प्रमाणपत्र, ब्लेंडिंग मशिनचे बील व प्रमाणपत्र यासह अनेक प्रमाणपत्र व कागदपत्रे मागवणे अनिवार्य आहेत.

मात्र बावणे यांनी प्रमाणपत्र न मागताच करारनामे केलेत. तत्कालीन प्रादेशिक व्यवस्थापक गजानन कोटलावार यांचे गैरव्यवहार झाकण्याचा प्रयत्नही केल्याचे निदर्शनास आल्याने बावणे यांनी राईसमिलर्सकडून वसुली करीत दबावाखाली काम केल्याची दाट शक्यता आहे.

त्यामुळे बावणे यांना तात्काळ निर्लंबित करून त्यांच्या संपुर्ण संपत्तीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्यात आल्यास मोठे घबाड उघडकीस येण्याची दाट शक्यता लक्षात घेता उचित कारवाई करण्याची मागणी दिलेल्या तक्रारीतुन कऱ्हाडे यांनी केली आहे.